म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. २४५४



REFBK-0023547
REFBK-0023547

# संजीवनी

संजीवनी मराठे

# संजीवनी

( सौ. संजीवनी मराठे यांच्या निवडक कविता )

संपादक

**प्रा. भालचंद्र खांडेकर**

REFBK-0023547
REFBK-0023547

अनमोल प्रकाशन, पुणे ४११ ००२

प्रकाशक :
मो. द. नांदुरकर
अनमोल प्रकाशन
६८३ बुधवार पेठ
पुणे ४११ ००२

© सौ. संजीवनी मराठे

प्रथमावृत्ती :
३१ मार्च १९७६

मुद्रक :
चिं. स. लाटकर
कल्पना मुद्रणालय
४६१/४ ' शिव-पार्वती ' टिळक रोड
पुणे ४११ ०३०

मूल्य ६ रुपये

या पुस्तकाचा कागद महाराष्ट्र राज्य शिक्षण-खात्याने उपलब्ध करून दिलेल्या सवलतीच्या दरातील आहे.

## अनुक्रम


प्रस्तावना : प्रा. भालचंद्र खांडेकर — पाच ते अठ्ठावीस

कविता स्फुरते कशी — १
गीत — २
स्वच्छंद — ३
प्रतीक्षा — ४
दयाघना — ५
कोण — ६
शांत सागरी कशास — ७
स्वप्नस्मृती — ८
कशास न कळे — १०
मधुमास — ११
सुंदरते सखि — १३
कुणितरी — १४
निर्धार — १५
सुखमय हा संसार — १६
एक सानशी कळशी — १७
आज चराचर उजळे — १८
निवेदन — २०
न कळता निघून जा — २१
साद तुझी — २२
तीच काय मी — २३
नाही आता — २४
तू नि मी — २५
मौन — २६
माहेर — २७
माझे आई — २८
गृहिणि येथ मी — २९
मी दिवाणी — ३१
ऋण — ३२
तू न माझा एकटीचा — ३३
ही आशेची कळी — ३४

गुलछडी ही ३५
वेल्हाळ ३६
चंद्रफूल ३७
ही कृपा ३८
स्त्री माझे नाव ३९
स्वप्नात येऊ का ? ४०
मज शाम भेटला ४१
प्रीत हवी तर ४२
यात्रा ४३
जीवना रे ४४
त्या क्षणी आलास का ४५
आज मी भानात नाही ४६
अमरदिवा ४७
प्रश्न सुंदराचा ४९
हवा उन्मनी ५०
प्राक्तन ५१
पारिजात थरथरला ५३
अनुपम ५४
प्रेमाकार ५५
मी माझी ५६
चिरेबंदी ५७
मला हवी होती ५९
म्हणून सांगते ६०
तू तरी ६२
अचानक ६४
भूमी ६५
स्पर्श तुझा ६६
प्रेम माझं ६७
तोंवरच ६८
कवितेवाचून ६९
शुभरजनी ७१
माय मराठी ७२
अर्थ नवा ७३
नव गौरव ७४
नको निबंधन ७५
निरोप घेताना ७६
परिशिष्ट ( बालगीते ) ७७
आई, तुला दाखवू का ७९
ढग आले ८०
शहाणा ८१
हे घर ८२
बरं का ग आई ८३
नको बाई रूसु ८४

## ॥ प्रस्तावना ॥

सौ. संजीवनी मराठे यांचे काव्यलेखन गेली पंचेचाळीस वर्षे सातत्याने चालू आहे. १९३२ साली त्यांचा पहिला काव्यसंग्रह प्रसिद्ध झाला. आणि तेव्हापासून त्यांनी लिहिलेल्या निवडक कवितांचा हा संग्रह-' संजीवनी '- आज प्रकाशित होत आहे. १९३२ ते १९७६ या कालखंडाकडे नुसती नजर टाकली तर मराठी काव्याच्या अभ्यासकाला संजीवनींची कविता, तांबे-रविकिरण मंडळ आणि कुसुमाग्रज-बोरकर-माडगूळकर यांच्याबरोबरच नवकाव्यापर्यंतच्या काळातून वाटचाल करीत आहे हे जाणवेल. म्हणजेच संजीवनींच्या कवितेने मराठी कवितेतील निरनिराळी वळणे पाहिली आहेत, वळसे अनुभवले आहेत. अशा स्थितीत संजीवनींच्या कवितेला मराठी कवितेच्या दालनात एक मानाचे स्थान लाभले आहे ही गोष्ट तितकीच लक्षणीय आहे. ' संजीवनी 'त त्यांच्या काव्यगुणांचे दर्शन कशा स्वरूपात घडते ते पाहणे मनोरंजक ठरेल.

संजीवनींची कविता मराठी रसिक वाचकांत प्रथम लोकप्रिय झाली ती त्यांच्या गोड आवाजामुळे, तिच्यातील गेयतेमुळे ! रविकिरण मंडळातील कवींच्या समवेत संजीवनींनी आपली कविता व्यासपीठावर गाऊन दाखवून रसिकांकडून सुरुवातीलाच

पावती मिळवली. रविकिरण मंडळातील कवींच्या काव्यांचे सामर्थ्य आणि मर्यादा स्पष्ट करताना ती कविता 'काव्यगायनामुळे आपल्या काव्यातल्या काव्यगुणापासून दूर जाऊ लागल्याचे दिसून आले. संजीवनींच्या कवितांवर तांब्यांच्या संपन्न गीतशैलीचा आणि उदात्त आशयाचा प्रभाव जितका समर्थ होता, तितकेच रसिकांनी त्यांच्या कवितेला दिलेल्या पावतीचेही त्यांना जबरदस्त आकर्षण वाटत होते. त्यामुळेच की काय, त्यांची कविता 'भावगीत' स्वरूपाची आकारत होती. रवींद्रनाथ टागोरांच्या 'गीतांजली', 'दी गार्डनर', यांसारख्या काव्यातील सहजता, काव्यात्मता, भावरम्यता आणि काव्यानुभवातील स्वप्नाळूपणा यांच्याही प्रभावाने त्यांचे मनोभाव अपार्थिव व भावजीवनासाठी व्याकुळ झाल्याचे जाणवते. अशा स्थितीत संगीताचे वेड व गृहिणीचा पेशा सांभाळून त्यांनी जी सहज, जाता जाता, काव्यरचना केली तीच त्यांची कविता होय.

संजीवनी कॉलेजात असताना यशवंत, गिरीश, मायदेव यांच्या रचनांकडे त्या आकर्षिल्या गेल्या. तर पुढे कविसंमेलनाच्या निमित्ताने बोरकर, कुसुमाग्रज, मर्ढेकर, ना. घ. देशपांडे, बापट, करंदीकर, पाडगावकर, पद्मा यांच्या कवितेशी त्यांची ओळख झाली. असे असले तरी कळूनसवरून त्यांनी स्वतःवर कुणाचाच प्रभाव पडू दिलेला नाही. प्रारंभीची पारंपारिक दृष्टी, श्रद्धाळू मन, काव्यविषयक विचार पुढे पुढे बदलू लागले. दुसऱ्या महायुद्धापूर्वीचे, तांबे व रविकिरण मंडळाचे वलय फोडून, त्यांनी आपल्या कवितेला जुने विषय व जुन्या शैलीतून बाहेर काढले. आपली गेयानुकूल वृत्ती, आपला संसार, आपल्या मर्यादा, आपल्या भोवतालचा परिसर, आपली मते यांच्याशी प्रामाणिक राहूनच त्यांची पुढली कविता आकारू लागली. या कवितांतून प्रामुख्याने प्रेमाच्या विविध छटा रेखाटल्या गेल्या. त्यांची स्वतःची अशी थोडीफार काव्यदृष्टीही आता घडली होती.

स्वतःला आलेला प्रत्यय मनाच्या तळापासून आलेला असावा, आणि स्वतःला आस्वादता येईल अशीच त्याची अभिव्यक्ती असावी, अशी त्यांची स्वतःच्या कवितेबद्दलची कल्पना आहे. 'संजीवनी' मध्ये याची प्रचीती ठायी ठायी येते, ही गोष्ट उल्लेखनीय आहे.

'काव्य ही निर्मिती आहे, रचना नव्हे' असे म्हणले जाते, व असे म्हणणारांना कविता ही परिणाम घडविण्यासाठी असत नाही असेच सांगायचे असते. हा विचार

कवितेच्या अभ्यासाच्या संदर्भात मधल्या काळात बळावलेला होता. आणि हा मधला काळ म्हणजे कलेविषयी बेफिकीर झालेल्या काव्यरचनेचा काळ ! अगदी नजीकचा आपल्या समोरचा ! विशेष म्हणजे श्रुतिसुभगता आणि नादलुब्धता या दोन काठांना हाताशी धरून संजीवनींची काव्यसरिता वाहात असतानाचा हा काळ ! अशाही स्थितीत संजीवनींची कविता नजरेसमोरून चटकन दूर करू म्हटल्याने दूर करता येत नाही हेच तिचे वैशिष्टय आहे. रविकिरण-मंडळातल्या कवींनी आपली कविता गाऊन दाखवून सामान्य रसिकापर्यंत पोचवली, तर आजच्या करंदीकर–पाडगावकर–बापटांनी आपली कविता वाचून दाखवून अशीच सामान्यापर्यंत पोचवली. एकूण काय, मराठी कवितेने काळ ओलांडला तरी रसिकाला ओलांडून जाण्याचा विचार अद्याप तिला पेलवत नाही हेच खरं ! निराळ्या शब्दात सांगायचं म्हणजे रसिकाचं–वाचकाचं भान ठेवूनच मराठी कवींची रचना होत आली आहे. ‘ स्वान्तः सुखाय ’ लिहिलं जात असलं तरी ते वाचकांपुढे ठेवलं जातं, इतकंच नव्हे तर वाचकाची दाद मिळावी अशी अपेक्षाही असते ! पण काही वेळा हे सत्य नाकारण्याचा प्रयत्न केला जातो; आपली आपल्याशीच प्रतारणा केली जाते. संजीवनींची कविता अशी स्वतःची प्रतारणा करणारी नाही. ती जशी स्वतःशी प्रामाणिक आहे, तितकीच रसिकांशी–श्रोत्यांशी–वाचकांशीही प्रामाणिक आहे. तिच्याजवळ आत-बाहेर असं काही नाही. कलावंताचं जीवन त्याच्या कलाकृतीतून पाहावं, असं म्हटलं जातं. संजीवनींच्या कवितेतच त्यांचं दर्शन घडते आणि त्यांचं जीवन व कविता ही एकमेकापासून वेगळी काढताच येत नाहीत. याचं एकमेव कारण म्हणजे, त्यांची कविता ही त्यांच्या अनुभवांतून जन्माला आली आहे.

काव्याविषयी आपल्या काही कल्पना असतात, त्याचप्रमाणे कवीच्याही असतात. या कल्पना एकूण काव्याविषयी जशा असतात, इतरांच्या काव्याविषयी असतात, तशाच आपल्या काव्याविषयीही ‘ बनवल्या गेल्या ’ तर त्यात अस्वाभाविक असे काहीच नाही. ज्ञानदेवांपासून मर्ढेकरांपर्यंत असे काव्यविषयक विचार कवींनी व्यक्त केलेले आहेत. तुकारामाची कविता त्याचा ‘ विश्वंभर ’ बोलवितो, तर ‘ अशी असावी कविता फिरून ’ हे ‘ सांगावया कोण तुम्ही कवीला ? ’ असा सवाल केशवसुत टाकतात. आपल्या कविता किती नाजूक आहेत हे सांगताना ‘ कुस्करू नका ही सुमने ’ अशा शब्दांत रसिकांना विनवणी करणारे तांबे दिसतात, तर ‘ आशयाचा तूच

स्वामी शब्दवाही मी भिकारी ' असा प्रामाणिक उद्गार मर्ढेकरांसारखा कवी बोलून जातो. कवीने, कवी आणि काव्यविषयक विचार व्यक्त करणे ही ' टूम ' नाही, तो कवीचा प्रामाणिकपणा आहे, तो एक दृष्टिकोण आहे, ते एक मत आहे. काव्य-विषयक विचार व्यक्त करणाऱ्याला आज ' सांप्रदायिक ' ठरविण्याची समीक्षकांच्या मध्ये एक साथच पसरू लागल्याचे जाणवू लागले आहे. कारण हा विचार केशव-सुतानंतर इतरांनी व्यक्त करणे हे बरं नव्हे, असं त्यांना वाटते. कवितेला कोणताही विषय वर्ज्य नाही हे जर खरं असेल, तर काव्यविषयक अथवा आपल्या कविते-संबंधी कवीने काही विचार व्यक्त केले तर बिघडले कुठे ? त्यामुळे कवीचे स्थान डळमळण्याचे काहीच कारण नाही. तसंच पाहिलं तर आपल्याला ' कविता स्फुरते कशी ? ' हे तुम्हा–आम्हाला सांगायची येथे कवयित्रीची इच्छा नाही.

' मी न कुणाला सांगायची कविता स्फुरते कशी ' असं बजावून बजावून ती आपल्याला सांगतच राहते, आणि दुसरीकडे तिची कविता आकार घेतच असते. मग अचानक मनातली उर्वशी जनात प्रकट होते, शब्दांच्या गौळणी शिरी रसांचे कुंभ घेऊन ठुमकत जातात. आणि कवितेच्या सृजनाचे चित्रण ' सांगायचे नाही ' असं ठरवूनही सांगितलं जाते. आपले काव्य म्हणजे ' स्वरसुंदर जीवनमंदिर ' आहे असेच कवयित्रीला वाटते; जणू या शब्दांतून संजीवनी आपल्या कवितेतील गेयता व गोडवा स्पष्ट करून जातात,— तोही त्यांच्या नकळत ! आपल्या कवितेचा जन्म सांगून, आपली कविता ' मन रिझवायाची अनुपम रीत ' जाणूनच इतरांच्या ' हृदयीची सारी तळमळ शांत ' करण्याइतकी समर्थ व संपन्न असल्याचा विश्वास संजीवनी व्यक्त करतात.

विश्वातलं सौंदर्य आपल्या कवितेनं टिपावं ही आकांक्षा संजीवनी वारंवार बोलून जातात. आपल्या प्रतिभेला उड्डाण करायला सांगताना; तिने क्षितिजे ओलांडून ' शिवसुंदर ऐसे सुकाव्यदान जगा'ला द्यावे असे त्यांना वाटते ( आज चराचर उजळे ), तर ' सुंदराचे स्वप्न आपल्या लोचनांनी पाहावे ' यासाठी ' मी दिवाणी, मी दिवाणी ' असे म्हणत त्यांना धुंद, व्हावेसे वाटते. अशा अवस्थेतच ' हवा उन्मनी प्राशन ' करून अफाट अनुभवविश्व प्राप्त होताच त्यांना जे बळ प्राप्त होते त्यामुळे मग त्यांना काव्याची विविध रूपे रेखाटता येतात. आणि त्यांना वाटू लागते ,

सूरशब्द रसरूपमत्त मी
हस्त शिवाचा माझ्या माथी '

आपली सारी अभिव्यक्ती सुंदरतेच्या चित्रणासाठीच आहे असं त्यांना सांगायचं आहे. म्हणूनच 'स्त्री'चे माहात्म्य गाताना 'सुंदरतापूजक मी, तीस्तव मम अभिव्यक्ती ' असं त्या अभिमानपूर्वक म्हणतात. इतकेच काय, पण 'सुंदरता' ही त्यांची सखी असून तिने त्याना ळळा लावल्याचाही त्यांचा दावा आहे. 'सुंदरतेच्या पायी जीवनलय लागावी ' हा ध्यासच त्यांना लागून राहातो. ही सुंदरता 'अनुविध रूपे ' घेऊन येताना त्याना सतत दिसून येते. ही सारी रूपे त्यांच्या कवितेच्या परिचयाची आहेत. हे त्यांच्या कवितेचं मनोगत आहे. पण 'आपल्या' पुरतंच सांगून संजीवनी थांबत नाहीत. साऱ्या कवीजातीच्या काव्याचं मर्महीं त्यांना जाणवतं. साऱ्या कवींचं काव्य हा एक 'अमरदिवा ' आहे असं त्यांना वाटू लागतं,

' मर्त्य आमुच्या हाती आम्ही धरिला आहे अमरदिवा
श्वसनीं आमुच्या भरूनी राहे स्वर्गामधली विमल हवा '

असा हा केशवसुतांच्या पद्धतीचा विचार त्यांना स्पर्शून जातो. पण या दिव्याची अक्षय कांती तीनही भुवनांना प्रकाशमान करणारी आहे. येथे कणाकणावर क्वचित नवी काजळीही येते, आणि नित्य नवा दीपोत्सवही होतो, कवयित्रीचं लेखन अशा विविध रूपांतून आकार घेत आहे. कवयित्रीला जे सांगायचं आहे ते 'सांगणं अजून सरलेलं नाही ' तिला कुणी विचारलं तर तिचं म्हणणं असं आहे.

' की अजून माझी पहिलीच आहे ठेवण
रंगाची गंधाची आकृतिबंधाची
फक्त रीत वेगळी
छंदाची
तूच खुणावलंस म्हणून थांबते
एरव्ही चालणं अजून माझं संपलेलं नाही. "

' संजीवनी 'मध्ये आपल्या काव्यविषयीचे गूज व्यक्त करणाऱ्या अशा कितीतरी जागा आहेत.

काव्य आणि सौंदर्य यांचा सुंदर संयोग येथे घडून आल्याचं जाणवतं, याचं कारण संजीवनींच्या सौंदर्यासक्त मनोवृत्तीत आहे. त्यांच्या या वृत्तीचा कौटुंबिक जीवनात प्रारंभी प्रारंभी, झालेला कोंडमारा या उद्गारातून साकार झाला आहे. सौंदर्य टिपावं, सौंदर्यांचा ध्यास घ्यावा, सुंदरतेला सखी मानावं आणि मनमोकळा आविष्कार करावा यामागे, एकेकाळी त्यांच्या सौंदर्यवादी वृत्तीला झालेला विरोधच कारण असावा. सौंदर्य निर्मिती म्हणजेच कवित्व अशी संजीवनींची जाण आहे, याचे प्रत्यंतर येथे यावे हे स्वाभाविकच आहे. स्वतःच्या जीवनानुभवाचा आणि त्यांच्या कवितेचा घनिष्ट संबंध आहे असे म्हणावे लागते ते यासाठीच !

'संजीवनी'त बहुसंख्य प्रेमकविता दिसून येतात. आणि अशी कविता या संग्रहात स्वाभाविकच आहे. स्त्री-विश्वाचं हे अनुभवातून आकारलेलं दर्शन आहे. मराठी प्रेमकवितेत मनमोकळा आविष्कार ही काही नवीन गोष्ट नाही, पण 'स्त्री'नं असा मनमोकळा आविष्कार करायचा म्हटलं तरी तिला हा मनमोकळेपणा कुठवर दाखविता येईल याचं भान काल-परवापर्यंत तरी स्त्रीला ठेवावं लागलेलं आहे. कारण 'स्त्री'च्या अस्तित्वाचा प्रश्न हा, नाही म्हटलं तरी, तिला दृष्टिआड करून चालणारा नाही. संजीवनींची कविता याच काळातली आहे.

या प्रेमभावनेत पृथगात्मता आहे. हे प्रेमविश्व विविध अनुभवांचे आहे. प्रीतीचा स्वप्नील साक्षात्कार दाखविणारी चित्रे येथे कुठे कुठे आढळून येतात. 'नयनात नीज साठवीत. ते गोड स्वप्न मनी आळवणारी,' स्वप्नस्मृतीत गुंगून जाणारी, प्रणयिनी जशी येथे दिसते; तशीच जीवनातल्या 'स्वप्नांचा मधुमास' फुलवणारी कुणी प्रेम-माळीणही कुठे आहे. मग स्वप्नसुमांच्या कोवळ्या निद्रेच्या भूमीवर तिचा हा 'मधुमास' बहरू लागतो. तिने जे जागेपणी इच्छिलेले असते ते या 'स्वर्भूमि' मध्ये रुजते. तर एखादी राधा मनीच्या वनात आपल्या 'शाम'ची भेट घेताना तृप्त होत असते. सत्यात भेटता न आल्यामुळे 'स्वप्नात येऊ का ?' असं विचारणारी कामिनीही येथे दिसून येते.

प्रेमाचे स्वप्नाळू विश्व प्रेमकवितांत आढळावे हे स्वाभाविकच आहे. कारण 'प्रीती हवी असेल तर' 'अलौकिकाचा शाप हवा' असतो आणि तो कशासाठी ? तर 'भवती असलेल्या हळव्या संसाराच्या व्यापा'साठी ! प्रेमाचे स्वरूपच असे आहे की,

'प्रीत हवी तर व्यथेव्यथेतही रसरंगाची साथ हवी
प्रीत हवी तर उरात केवळ प्रीतीवरली प्रीत हवी.'

प्रेम आकार घेते तो एक सुवर्णक्षणच असतो. असा सोनेरी क्षण हे प्रेमाचे माहेरघरच !

प्रेमाचे विविध रूपातले दर्शन 'संजीवनी'मध्ये घडते. मग प्रीतीचा गोड घास हातात घेऊन त्याची 'प्रतीक्षा' करणारी, त्याच्यासाठी दारातले अंगण स्वच्छ ठेवणारी, निरनिराळ्या रूपांत त्याचे दर्शन घेऊ इच्छिणारी ही प्रणयिनी 'प्रतिपली' त्याच्या चाहुलीची अनुपम माधुरी चाखीत राहाते. तर 'त्याच्या' सहवासासाठी कासावीस झालेली अशीच कोणी एक 'कुणीतरी बसावे येउनि मज सन्निध' म्हणून मनातली उदासीनता घालवणारा, तिचं कौतुक करणारा, हा संसाराचा भार आपण कसा काय पेलत असू हे जाणणारा 'तो' जर आपल्याला 'जाणून' घेईल तर ती गात्रागात्रांतून फुलून जाणार असते. त्याच्याबरोबर हसण्या-रडण्यात तिला सुख वाटते. अशी साथ रात्रंदिन जर कुणी करील तर तिची 'कासाविसी सरून जाईल' असा तिला विश्वास आहे. हे गृहिणीचं—कोणाही सामान्य गृहिणीचं—मनोगत अगदी वेचक शब्दात हलुवारपणे संजीवनी येथे व्यक्त करून जातात. स्त्रीमनाचा हा अपूर्व, पण सुप्त भावांचा, आलेख कोणाही स्त्रीची 'ही कासाविशी' दूर करील यात शंका नाही. संसारात पदार्पण केलेल्या स्त्रीच्या कौटुंबिक समस्या तिच्या तिलाच ठाऊक ! पण गृहस्थाश्रम स्वीकारल्यावर आपल्या पतीला 'करू ये सुखमय हा संसार असं आश्वासन देणारी पत्नी, आपले प्रेम व्यापक असावं असं सांगताना येथे दिसते आपण 'गुणी जनांना निजस्नेहाचे दार खुले करू या' असं सांगणारी ही गृहिणी अगत्यशील तर आहेच, पण 'धर्म-अर्थ-कामाचे सुव्रत' कायावाचामने आचरण्या इतकी सोज्वळही आहे. ही कविता वाचताना कवयित्रीच्या व्यापक प्रेमदृष्टीचा प्रत्यय येतो, तो लक्षणीय आहे.

'आपला संसार सुखमय करू' असं आश्वासन देणाऱ्या गृहिणीचा पतीही तितक्याच 'निर्धार' पूर्वक तिला सांगतो की,

'ठेविलेस स्कंधी विश्वासाने शिर, सोडायाचा धीर नाही आता'

कारण 'संसारातच मुक्तीचे माहेर आहे'अशी या पतीची श्रद्धा आहे. 'संजीवनी'-मधल्या प्रेमकवितेतली पुरुष-मुखातली ही एकच कविता आहे. आपल्या पतीचा

‘ निर्धार ’ ऐकल्यावर ‘ ठेव सख्या मजवरी विश्वास ’ असं अभय देऊन, ‘ मी तुला ‘ शिवाची हाक कानी येईपर्यंत ’ सोडणार नाही ’ असं ती ‘ निवेदन ’ करते. इतकं केल्यावर ‘ गृहिणी येथं मी ’ असं अभिमानानं सांगताना तिचा ऊर फुलून आल्यास नवल ते कोणते ? तिचे अगत्य व आदरातिथ्य न सेवताच जर कुणी जायचं म्हटलं तर ते तिला कसं मानवेल ? तिच्या घरात सतत ‘ मानवतेचे पूजन ’ चालू असल्यामुळे ती कुणाही मुशाफिराला ‘ उन्हउन्हित दोन घास ’ खाऊन जाण्याचा आग्रह करताना दिसते. या स्त्रीची पतिनिष्ठा अशीच मनस्वी असावी हे स्वाभाविकच म्हणावे लागेल. तो पतीच तिच्या संसाराचे ओझे वाहतो, ती कोमेजून जाताच तिला प्रसन्न करतो. ती रागावली तर तो कोमल बनतो, तिच्या बोलासाठी कंठात सूर घोळवतो. तिला जगवण्याची त्याची इतकी धडपड चालू असते की तो स्वतःचे अस्तित्वच विसरून जातो. अशा वेळी,

‘ माझे मागील जन्माचे का रे फेडितोस ऋण ? ’

असं जर या पत्नीला वाटलं तर ते चूक ठरेल का ?

असं असलं तरी तिलाही तिच्या अस्तित्वाची आणि कर्तृत्वाची जाण आहे. ‘ चंद्रफूल ’ मध्ये आपण संसारात निरनिराळ्या भूमिका कशा पार पाडीत आलो आहोत याचं तिला भान आहे. ऊन–पाऊस–वारा यांचा मारा सहन करीत करीत, कधी लाजत, कधी हासत, कधी नाराजीने प्रपंचाच्या प्रांगणात आपण गंधच उधळीत आलो आहोत. नव्हे गृहिणीला हे सारे, सोशीत, फुलत–झुरत–इतरांना फुलवीत करावंच लागतं. प्रपंचात ‘ गुल्छडी ही ’ कशी वेगवेगळ्या रूपात वावरत असते ते पाहण्याजोगं आहे. जीवनासक्त वृत्तीने जगणारी ती कधी कामुक होते, कधी गोरीमोरी, कधी बावरी, कधी अगतिका, कधी गतिमान, कधी तृप्त, तर कधी स्वप्नाळू अशा अवस्थांतून जात असते.

‘ गुल्छडी ही ’ या कवितेत संसारी स्त्रीच्या विविध रूपांचे चित्रण आहे, तशीच, कवयित्रीच्या कवितांची, विविध रमणीय रूपेही सूचित होताहेत असे म्हटले तर ते अस्थानी ठरू नये !

ज्याच्यासाठी आपण आपले सर्वस्व वाहत आहोत, त्याच्याबरोबर संसाराची वाटचाल करून ‘ ती ’ शिणून जावी हे स्वाभाविक आहे. तसं पाहिलं तर ‘ जाईन तेथे माझे घर, राहीन तेथे गाव ’ असं जीवन जगत असताही, वाट चुकणे संभवनीय

नसूनही, ती शिणून जाते. अशावेळी तिला, त्या भांबावलेल्या अवस्थेत त्याचा आधार हवाहवासा वाटतो. म्हणून ती म्हणते, ' तू तरी हातचा म्हणून पुढे उभा रहा ' त्याच्याबद्दलचा तिला पूर्ण विश्वास असला, तोच मार्गदर्शक व्हावा असं तिला वाटत असलं तरी ' अचानक ' आपण त्याच्या भेटीस गेलो तर तो काय करील ते तिला जाणून घ्यावंसं वाटतं ! प्रपंचात पतिपत्नीचं जीवन हे कित्येकवेळा एक कोडेच ठरतं. जीवन आणि मृत्यू यांच्यामधल्या ' भूमी 'वर ती उभी असते, क्षितिजाच्या पलीकडे जाण्याची जादू तो तिला शिकवतो, क्वचित तिच्या प्रगतीसाठी तो तिच्यापासून दूर जातो. तेव्हा ती त्याला म्हणू लागते.

' मी मला विसरेन म्हणून तू दूर गेलास
शब्द स्मरणात बांधीन म्हणून तू सूर नेलास '

अशा प्रकारे तिच्या अस्तित्वाचं भान तिला होतं, हवंही असतं ! स्वतःच्या अस्तित्वावर संजीवनींचं अपार प्रेम आहे. ' प्रेम माझं ' माझ्यातच राहातं, माझ्यातलं खातं-पितं, कधी वसंतोद्यानात फुलं होऊन रंगतं, माजघरात मावळतं, परसदारात धुमसतं—अशा वेळी गाऱ्हाणी न्यायची कुठं ? तिच्याच प्रेमाकडून तिला शासन मिळत असतं. कौटुंबिक प्रेमाचं हे स्वरूप जितकं लोभस तितकंच कवयित्रीचं अस्तित्वही मान्य करणार आहे.

पतीच्या सुखाच्या आणि दुःखाच्या क्षणी ती जशी होती, तशीच आत्ताही ती असते. पतीच्या सुखदुःखात ती मिसळून जाते हे खरं असलं तरी ' ती ' असते हे तिचं रूप आहे. ती त्याच्या जीवनातलं केवळ स्वप्न असत नाही. म्हणून तिला म्हणावंसं वाटतं,

' स्वप्न सख्या ! ऐकतोसना हे ?
अशी असण्यापुरती तरी मी माझी आहे. '

संजीवनींच्या कवितांतून या ' मी ' ची, स्वतःच्या अस्तित्वाची जाण अधून मधून डोकावते हे लक्षात घ्यावे लागते. आपले हे अस्तित्व, स्त्रीचं अस्तित्व आहे, आणि ' स्त्री ' ही कुणी सामान्य शक्ती नाही की केवळ साधी गृहिणी नाही. ती साक्षात संस्कृतीच आहे. तिला परंपरा जोपासायची आहे आणि नव्याचं स्वागत करायचं आहे.

' संस्कृति मी जणु समूर्त स्त्री माझे नाव असे ' असा उच्चार ती अभिमानपूर्वक करते आहे. बालास्तव, वृद्धास्तव कष्ट करताना तिला काही सायास पडत नाहीत. पतीचं प्रेम मिळालं की, तिला ' सदनाहुनि स्वर्ग फिका ' वाटू लागतो. ती कांता आहे, माता आहे, शिक्षक आहे, सेवक आहे, कलावती आहे, शास्त्रज्ञा आहे; इतकेच नव्हे तर ती विश्वाची प्रतिभा आहे आणि समृद्धीचे आगर आहे.—स्त्रीची विविध रूपे येथे संजीवनी सांगतात ती केवळ यादी देण्यासाठी नाही. स्त्रीच्या अस्तित्वाचे आणि सामर्थ्याचे, तसेच तिच्या सेवेचे आणि त्यागाचे रूप दाखविणारा हा आलेख आहे. भारतीय स्त्रीनंच संस्कृती जोपासली आहे, नव्हे स्त्री आहे म्हणूनच संस्कृती अद्यापही शिल्लक आहे, हे सत्य आजच्या सुशिक्षित स्त्रीलाही मान्य करावे लागेल. स्त्रीने रेखाटलेली ही स्त्रीची प्रतिमा, तिच्या विश्वाचं प्रामाणिक आणि प्रत्ययकारी दर्शन देणारी आहे.

पण स्त्रीला प्राप्त होणारे हे सारे वैभव, तिचा सारा संसार, तिची मुलं-लेकरं, तिला जीवनात सतत सिटत-उमटत जाणवणारे सप्तरंग, अथवा वाट्याला येणारे अमृतक्षण ' ही कृपा ' हरीची आहे असे संजीवनींच्या श्रद्धाळू मनाला वाटते. संजीवनींच्या श्रद्धाळू मनाचं दर्शन घडविणाऱ्या आणखीही काही कविता या संग्रहात आढळतात.

' संजीवनी मधल्या ' तृप्त प्रेमाची, संसारी-स्त्रीच्या विश्वाची चित्रे पाहाताना तिच्या जीवनाला जिथे आकार येतो ते ' माहेर ' सासरी आल्यावर तिला कसं वाटतं हे पाहण्याजोगे आहे. येथे ही माहेराची वाट पानाफुलांची, फळांची, मखमली हिरवळीची आहे. हे माहेर म्हणजे परमानंदाचे घर, नंदाचे गोकुळ आहे ! इथली रीत ऋजू वळणाची आहे. या माहेराचा मान वडिलांनी वाढविला असून तो या मुलीच्याकडे सोपविलेला आहे आणि या गृहिणीचं सुख फुलतं आहे याचं कारण, ' माहेरची फुलवात, सासरचे नीरांजन, प्रकाशाला आमंत्रण ' स्त्रीच्या जीवनात ' माहेर-सासर ' यांना किती व कसं महत्त्व असतं हे या कवितेत प्रकट झालं आहे.—सासरी सुखाच्या सागरात मुलीचा जीव हेलावत असताना कदाचित आईबद्दलच्या स्मृती जरी पालवल्या नाहीत, तरी ' मात्र तान्ह्या लेकराला चुंबिताना कवळोनी तुझ्या स्मृती माझ्या मनी, माझे आई ' अशी तिची मनःस्थिती झाल्याविना राहात नाही,

'संजीवनी'तल्या स्त्रीच्या जीवनातल्या, परिपक्व होत जाणाऱ्या प्रीतीचं स्वरूप हे असं आहे. पण ही प्रीती नुकतीच कुठं उमलत होती. तिच्यात हुरहूर, उत्कंठा, वियोग किंवा प्रियकरानं तिला अस्वस्थ करण्याजोगं काही घडत असतं,—तेव्हाची या स्त्रीची मनास्थिती जाणून घ्यायलाच हवी. या दृष्टीने तिच्या शांत चित्ताच्या सागरात जेव्हा वादळे उठवली जातात त्यावेळी तिचे देहभान 'त्याच्या' या कृतीने हरपले जाते. ती अस्वस्थ होते. तिच्या जीवनात एक प्रकारची अधीरता भरून राहते. अन् तिला वाटू लागतं,

'स्वर्ग कल्पनेतला
येईल कधि भूतला
दिवसरात्र अंतरात आस ही उचंबळे.'

संजीवनींच्या या भावगीताने एकेकाळी मराठी रसिकांना मुग्ध केलेले आहे. या गीतातली आर्तता, भावोत्कटता आणि कवयित्रींच्या स्वतःच्या गळ्यातून बाहेर पडलेले सुस्वर अजूनही अनेकांच्या मनात घर करून राहिलेले आहेत—नव्हे, आजही संजीवनींच्या मुखातून हे गीत ऐकताना तोच अनुभव येतो! मराठी कवितेत संजीवनींना ज्या काही कवितांच्यामुळे विसरताच येत नाही, त्यांपैकी ही एक कविता आहे. ही व्याकुळ प्रणयिनी कल्पनेतला स्वर्ग भूतलावर कधी येईल म्हणून वाट पाहाताना दिसते. अशाच प्रियकरावरून जीव ओवाळून टाकण्यासाठी उत्सुक असलेली कुणी प्रियकराच्या वियोगाचं दुःख सोसताना विव्हल होताना त्याला उद्देशून म्हणते, 'जायचे असेल तरी नकळता निघून जा.' क्षणभरचा हा वियोग असेल तर—

'विरहि मीलनी सुखे मजसि गुंगवून जा'

असं तिला सांगावसं वाटतं. पण कायमचंच जायचं असेल तर मात्र

'जात जात पदतलीं प्राण हे चुरून जा'

असं सांगण्याखेरीज तिला गत्यंतरच नसतं! आपला जीव सानुला असला तरी 'प्रीती माझी थोरली' असा विश्वास असलेली दुसरी एखादी प्रणयिनी त्याची खुणेची 'साद' कानावर आली नाही तर भांबावून जाते, मग त्याला ती विचारते, 'मी न माझी राहिले तू त्या क्षणी आलास का?' स्वाभाविकच तिला वाटू लागतं, ज्याच्या आयुष्याच्या पथावर आपण छाया केली, त्याची काळजी स्वतः वाहिली

त्याच्या झोपेत स्वप्नफुले फुलविली, आणि आज मात्र एकांतात त्यांच्या सहवासातल्या स्मृती आळवीत आपण अश्रू ढाळतो आहोत.—खरंच, ' तीच काय मी ? ' की आजची अश्रू ढाळणारी मी कुणी वेगळीच आहे ? असा अनुभव घेतल्यामुळेच,

नाही आता ठेवणार मोहपाशी गुंतवून
नाही काही मागणार मीच आपुली देईन '

असं, आपलं मनोगत त्याला सांगून ती मोकळी होते. स्त्री प्रेम देते. ते निस्वार्थीपणानं, त्यासाठी ती ' वेदनेच्या काट्यामध्ये प्रेमपूर्तीचा गुलाब ' फुलविण्यास सज्ज असते. या मागचं कारण एकच, आणि ते तिलाच ठाऊक असतं. जे जे काही उणे-अधिक या जिण्यात असतं त्याला त्याच्याच सुखाचे दरवाजे असतात. तिचा अनुराग फुलतो तो त्याच्यासाठी, आणि कधी तिच्या मनात विराग उसळतो तोही त्याच्याचसाठी ! सख्य त्याच्याशीच, आणि द्वैतही त्याच्याशीच ! ' तू नि मी ' हे ' सदा तू नि मी ' याच स्वरूपात, अमर राहाणार असतात ! मग काही वेळा, मनातून खूप बोलायचे असूनही त्याना ' मौन ' स्वीकारावे लागते. निसर्गाच्या सान्निध्यात वास्तविक नितळ मुक्याने पाणी वाहते, वृक्ष मुके असतात, पाखरं वरती भिरभिरतात, निळे आकाश मुके राहाते, वारा मौन स्वीकारतो, डोंगर-भुंगे-ऊस, सारे वातावरण कसे निस्तब्ध होते. का ? त्यांना या दोघांचे बोल ऐकायचे असतात. त्यांनी आपापली मनं मोकळी करावीत असं त्यांना वाटत असतं. पण या दोघांना ' बोलायला ' जमत नाही !—मनात असूनही ! असं घडतं पुष्कळ वेळा, आणि निसर्गाची अपेक्षा ' या दोघांना ' पूर्ण करता येत नाही. या संग्रहातली ही कविता ' मौना 'तूनही खूप खूप बोलून जाते, त्यातच तिचं सामर्थ्य आहे, आणि तिचं सौंदर्य !

' संजीवनी 'तल्या प्रेमकवितांतून दिसणारे स्त्रीचे मन, तिचे भावविश्व, तिची निष्ठा, तिची अपेक्षा, तिचे अस्तित्व, तिची मीलनाची ओढ आणि वियोगातली श्रद्धा...हे सारं दृश्य एका अर्थी लोभस आहे. हे सारे चित्रण व्यक्तिगत प्रीतीचं आहे ! आत्मप्रतीतीचं आहे, अनुभवाशी प्रामाणिक आहे. तिच्यात स्वप्नाळूपणा असला, आणि आहेच; तर तोही स्वाभाविक आहे. कारण प्रीतीला स्वप्नाच्या मखरातच आकारता येतं. स्वप्न पाहणारी प्रेयसी, वियोगात अचल प्रेम व्यक्त करणारी प्रणयिनी, प्रपंचात अगत्य-आदर दाखवून पतीचा विश्वास संपादन करणारी

त्याला धीर देणारी—त्याच्यावर भार टाकून निवांत राहाणारी गृहिणीही येथे ' विविध रूपिणी ' झाली आहे. माहेरच्या नीरांजनात सासरची फुलवात लावून आपला संसार प्रकाशमान करण्याचं कसब तिला ज्ञात आहे...हे सारे चित्र परिचयाचे आहे जवळचे आहे, म्हणून आपलेसे वाटते. कौटुंबिकतेचे वलय या कवितेला लाभले आहे. स्त्रीच्या जीवनातील कन्या, रमणी व गृहिणीच्या अवस्थांना संजीवनींनी शब्दबद्ध केले आहे. त्या अवस्थांतल्या खऱ्या संवेदनांनी त्यांची कहाणी रंगलेली आहे.

' मी दिवाणी, मी दिवाणी ' असा पुनरुच्चार करताना संजीवनींना हेच सांगायचे आहे. सुंदराचे स्वप्न पाहावे, वेदनेला स्पर्श होताच आसवांचे दान द्यावे, कुणी स्नेह दाखविताच सर्वस्व अर्पण करावे,...जीवनासक्त वृत्तीचे दर्शन त्यांच्या रोम-रोमात भरून आहे. प्रेममग्ना आणि चंद्रवेडी असण्यात त्याना धन्यता वाटते ! आपण जीवनाचा उपभोग घेताना त्यासाठी कापराची ज्योत व्हायलाही तयार आहोत याचा त्याना आनंद आहे.

म्हणूनच म्हणावेसे वाटते की, ' संजीवनी 'तली प्रेमकविता ही केवळ शारीर प्रेमाचं चित्रण नाही, की, धुंद भावनांचे दर्शन नाही. ते एक स्त्री-मनाचं पारदर्शी आविष्करण आहे.

स्त्रीमनाचा आविष्कार आढळणाऱ्या कवितांतून वात्सल्याचे दर्शन घडावे हे अपेक्षित आहे. ' संजीवनी ' मध्ये बालगीतांचा एक वेगळा विभाग शेवटी आहेच पण ' वेल्हाळ ' व ' तू न माझा एकटीचा ' या दोन कवितांचा उल्लेख येथे करावा लागेल. आपल्या ' कुसुमकळी 'ला जोजावताना ' आपल्या हाती विश्वाची वत्सल लय एकवटली ' आहे असं सांगणारी माता कौतुकाच्या भावनेनं भारावलेली असली तरी तिच्यातला काव्यमय मनाचाच आविष्कार ती अधिक करून जाते आहे हे प्रामुख्याने जाणवते. तिचे कौतुक करताना, जीवनातल्या अंधारवेळी या मातेच्या मनात सुख उजळते, ती जेव्हा उन्हात न्हाते किंवा चांदणे पिते त्यावेळी तिला नजर लागू नये असं वाटावं हे स्वाभाविक असलं तरी हे चित्रण स्वाभाविक उतर-ल्याचे जाणवत नाही. ' तू न माझा एकटीचा ' असं सांगताना या मातेचं वात्सल्य उत्कटत्वाने प्रतीत होण्याऐवजी येथे देशप्रेम अधिक व्यक्त झाले आहे. काहीशी उपदेशाच्या भूमिकेवर देशप्रेमाची महती सांगणारी ही माता, जरी मुलासाठी

भूपाळी व अंगाई गाते, हातात घास ठेवते, शब्द ओठातच घोळवीत असते, तरीही हे चित्र वत्सल मातेचे न वाटता उपदेशक आईचे उतरल्याचा भास होतो.

'संजीवनी'मधील प्रेम कवितांत प्रामुख्याने संसारी-स्त्रीचे चित्रण दिसते, त्यातही प्रेयसी व पत्नी या दोन भूमिकाच बहुतेक कवितांतून आढळतात. तर जीवन हा एक प्रवास असून त्यात जीवनविषयक व्यापकतेचीच दृष्टी जाणवते.—हे सारे दृश्य जेव्हा आपण साकल्याने पाहू लागतो तेव्हा संजीवनींच्या संसाराची कल्पना आपल्याला स्पष्ट व्हायला काहीच हरकत नाही.

अशा स्थितीत त्यांच्यावरील तांबे आणि टागोर यांचा पडलेला प्रभाव मधून मधून डोकावतोच. मनाच्या ध्यासापलीकडे जावे असे पुन्हा पुन्हा संजीवनींना वाटते. 'आज मी भानात नाही.' असं त्याना म्हणावंसं वाटतं ते यामुळेच! म्हणूनच 'प्रभू मज नाचू दे स्वच्छंद' अशी आळवणी करताना त्या दिसतात. अशा वेळी प्रातः–सायंकाळी पसरणारी गगन-सुमावरची लाली त्यांना स्पर्शावीशी वाटते, तेजोगंध सेवावासा वाटतो, नित्य नव्या अशा विश्वकमळीचा 'चिरतृषित मिलिंद' व्हावंस वाटतं.–हे कशासाठी? तर या अवजड भवबंधातून बाहेर पडण्या-साठी! ही प्रभुपाशी केलेली प्रार्थना—सरळ, साधी आहे! आणि मग याच प्रभूच्या पाठबळावर त्या पुढचं पाऊल उचलू इच्छितात. सारा भार त्याच्यावरच टाकण्याची भाषा बोलू लागतात.

'पद टाकिन मी परि दयाघना
तू उभा पाठिशी असशिल ना?'

असा प्रश्न त्या प्रभूला विचारून जणू त्याच्याकडून आश्वासनच घेतात. त्या प्रभूच्या कृपेवरच त्यांचा संसार सुखाचा चालला असल्याचा निर्वाळा 'ही कृपा या कवितेत त्या देतात. त्याच्या कृपेमुळेच कधी कुठे दुःखाचा प्रसंग आला तर तोही निघून जातो असं त्याना वाटतं.

संजीवनींच्या श्रद्धाळू मनाचं हे प्रतिबिंब अशा काही कवितांतून उमटावे हे स्वाभाविक आहे. त्या स्वतः जरी असं मानत असल्या की, ही ईश्वरनिष्ठा प्रारंभी प्रारंभी जाणवत होती, व पुढे पुढे ती वृत्ती कमी होत गेली...तरी जोपर्यंत स्त्री श्रद्धेवरच जगत आली आहे तोपर्यंत या ईश्वरनिष्ठेविषयी तिनं संकोचावं असं काहीच नाही! वास्तवाची जाण होऊ लागल्यावर ही ईश्वराची जागा दुसरं कुणीतरी घेतं

इतकंच ! तांब्यांची ईश्वरनिष्ठाही केवळ ईश्वरविषयकच असली तरी ती एक निष्ठा आहे. श्रद्धाळू मनाचं ते प्रतीक आहे.

जाता जाता रसिकाला आकर्षित करून घेणाऱ्या आणखी दोन कवितांचा उल्लेख येथे अवश्य केला पाहिजे. त्या कविता म्हणजे संजीवनींनी रेखाटलेली दोन शब्द-चित्रे ! 'एक सानशी कळशी' ही त्यापैकी एक कविता ! संध्याकाळचा दिवे लागणीचा सुमार–एक मुग्धा एक सानशी कळशी विहिरीत सोडून पाणी भरते आहे. रहाटाला दोरीचा विळखा पडतो आहे, तिचे हात खाली-वर होत असताना तिच्या उरांचा नाच चाललेला आहे. ती मधेच धापा टाकीत आहे, मधून मधून पदराने कपाळावरचा घाम टिपीत आहे, विहिरीत पाणी आहे–नाही, पण ती कळशी वर येतच आहे. काळोखात ती कळशी पूर्ण भरलेली आहे की अर्धी हे कळतही नाही—कितीतरी वेळ तिचे पाणी भरणं चालू आहे. कवयित्री तिला पाहून विचारते,

'किती वेळ हे असे कळेना
तुझे ओढणे चालायाचे
सांग कधी तव सुभग करांनी
तृषितांना जळ लाभायाचे ?'

हे शब्दचित्र अगदी अचूक जागी संपलं आहे. नव्हे, तिथंच त्यातलं सौंदर्य मोहरलं आहे. आणि सौंदर्यासक्त मनाला एका सुंदर चित्राचा आस्वाद घ्यायची संधी कवयित्री देत आहे. हे पाणी ओढणाऱ्या मुलीचं चित्र अनिमिष नेत्रांनी खूप वेळ पाहात बसावंसं वाटतं. तृषितांना तिच्या हातचं 'जल' लाभेल तेव्हा लाभेल, पण हे सौंदर्य दृष्टीपुढून न हालण्यातच, तृषिताला 'तृषित' राहणंच, आवडेल ! स्वतःतच हरवून गेलेली ही मुग्धा किती वेळ अशीच पाणी ओढीत राहाणार कोण जाणे ? सौंदर्यासक्त संजीवनीच्या लेखणीनं एका सौंदर्याला बोलकं केलं आहे—, स्वतः त्यापासून दूर राहून !

'पारिजात थरथरला' ही कविता निसर्गाच्या पार्श्वभूमीवरची ! पण वातावरण-प्रधान. अंगणात वारा येताच त्याच्या चाहुलीने तो थरथरतो. मग त्याचा देह क्षण-काल 'सोनपऱ्यांचा झोला' होतो. त्याच्या विस्मित झालेल्या कळया गंधकेशरी शेला अंगावर ओढून घेतात...अशा वेळी तो 'शुभलक्षण वारा' येऊन 'अलौकिक

दान ' देऊन जातो. तेव्हापासून तो पारिजात तृप्त होतो, विरघळून जातो. या कवितेतलं वातावरण ऋजु तितकंच प्रसन्न आहे. गंधकेशरी शेला पांघरणाऱ्या कळ्यांचं चित्र पारिजातकाच्या फुलांच्या देठाचे व गंधाचे रूप-गंध सांगून जातात. विशेषतः 'गंधकेशरी ' शब्दातून सारे काही स्पष्ट होते... तसं पाहिलं तर, निसर्गाच्या पार्श्वभूमीवर कवयित्रीनं केलेले हे एक आत्मचिंतनच आहे ! परंतु केवळ एक निसर्गचित्र म्हणूनही या कवितेला काही वेगळाच अर्थ लाभतो. तोही तितकाच अचूक व वेधक आहे.

देशप्रेमाचा आविष्कार करणारी रचना ' संजीवनी 'मध्ये आढळते. ही कविता भावकाव्याचे दर्शन घडविण्याच्या दृष्टीने तितकीशी समर्थ उतरलेली वाटत नाही. काळाच्या ओघात काहीवेळा, काही कारणामुळे असे काव्य क्वचित लिहिले जाते. तो परिस्थितीचा प्रभाव असतो, पण त्यात उत्कटतेचा अभाव येतो. ' आज चराचर उजळे ' सारख्यां कवितेत उत्साही वातावरण असले तरी कवयित्री म्हणते त्याप्रमाणे ' येथले नवे संकल्प ' रेखाटणारे मन ' उत्कट श्वास ' सोडीत आहे, असे दिसत नाही. त्यामानाने आज इतिहासाला एक मनोरम ' अर्थ नवा ' लाभल्याचा उल्लेख करणारी कविता ' नव्या नवतीच्या पावलातला नवा जोष ' व्यक्त करताना काहीतरी नव्या कल्पना फेकून जाते. येथे मातीवर मेंदी चढते, चैतन्याचा दिवा लागतो, जनगंगेला पुरुषार्थ घाट बांधतो. ' नवगौरव ' हे गीत साधूंचा, विद्वानांचा, कलाधरांचा, श्रमजीवींचा, वगैरेंचा गौरव करण्यासाठीच जणू उतरलेले आहे असे वाटते. ' राष्ट्रप्रीतीच्या भक्तीचा जय ' करावा हाच हेतू यामागे आहे हे स्पष्ट व्हावे.

' माय मराठी ' या कवितेत संजीवनी आपले ' मराठी माती 'वरचे प्रेम व्यक्तविताना गुंगून जातात.

' माय मराठी ! तुझिया पायी तनमनधन मी वाहियले
तुझिया नामी तुझिया धामी अखंड रंगुनि राहियले '

या ' माय मराठी 'च्या अंकावर लोळण घ्यावे–बागडावे, जे ओठी तेच पोटी असली प्रीती तिच्यापासून शिकावी, तिच्यासाठी शब्दांची मोहनमाला गुंफीत बसावे इतकेच नव्हे तर—

' माय मराठी ! तुझियासाठी वात होउनी जळते मी
क्षणाक्षणाने कणाकणाने तुझ्या स्वरूपा मिळते मी '

अशी आपली श्रद्धा संजीवनी बोलून दाखवितात.

देशप्रेमपर कवितांचे स्वरूप हे असे आहे.

पण बालगीते हा संजीवनींच्या काव्याचा एक खास विशेष आहे. अशी सहा बालगीते या संग्रहात शेवटी—परिशिष्टात आढळतात. मग एखादा ‘ बाळ ’—‘ आई तुला दाखवू का बाबा होऊन ’ असं आपल्या आईला विचारतो, आणि मग ‘ बाबां ’प्रमाणेच भाऊ–ताई–आजी होऊन त्यांचे विशेष सांगू लागतो. पण शेवटी मात्र त्याला ‘ बाळ ’ होऊन आईच्या मांडीवर लोळून घ्यावंसं वाटतं. दुसरा ‘ बाळ ’ आईला आकाशात आलेले ढग दाखवून आपल्या शंका विचारीत सुटतो. शेवटी विचारतो, ‘ आई, कसे पडायचे मग चांदणे नि उन्ह ? ’ यापेक्षा एक ‘ शहाणा ’ मुलगा आपल्या स्वप्नात आलेली राणी आणि नाग यांची जी हकीगत सांगतो ती आगळीच आहे. ‘ हे घर ’ या बालगीतातल्या कल्पना अशाच वेधक आहेत. ‘ काळ्य काळ्या डोळ्यांची ’ ‘ नको बाई रूसू ’ मधली छोटी मुलगी आपल्याला नकळत वेड लावून जाते. पण खरी गंमत करते ती, आईला ‘ बेबी ’ व्हायला सांगणारी तिची बेबी ! ‘ बरं का ग आई ’ म्हणत, सबंध दिवसात ‘ तू आहेस बेबी, मी आहे आई हे विसरायचं नाही ’ असं बजावून बजावून सांगणारी बेबी पाहाताना आपण कौतुकानं सुखावून जातो. विशेष म्हणजे दिवसभरात आईला ‘ बेबीची ’ भूमिका देणारी ही बेबी ‘ झोपताना मात्र तू आई व्हायचं...दुपारचं काही आठवायचं नाही ’ हे सांगायला विसरत नाही.

संजीवनींची अशी बालगीते आज मराठी रसिकांत लोकप्रिय होत आहेत.

‘ संजीवनी ’मधल्या अनुभव-विश्वात चिंतनशील जाणिवेलाही एक आगळे स्थान आहे. हे चिंतन आत्मपर आहे तसेच जीवनपरही आहे. भावोत्कट आत्मलेखन करणाऱ्या संजीवनींच्या काव्यातली अशी चिंतनशीलता म्हणजे आध्यात्मिक या धार्मिक मनोवृत्तीचा भाग नाही. जीवनाचे विराट स्वरूप येथे आहे, त्यात आपण कसे जगत आहोत याचा विचार आहे, अवजड भवबंधातून मोकळे होऊन ‘ स्वच्छंद ’ नाचण्याची इच्छा आहे, जीवरूपी बाळाला कशाची ओढ लागली आहे हे न कळून त्याची काळजी वाहणारी माता येथे आहे, तर जीवनाच्या यात्रेत गोंधळून गेल्यामुळे स्वतःच्या अपूर्णतेची जाण येऊन ध्येयप्राप्ती होत नसल्याची खंत आहे, जीवनाशी खोटी सलगी करायला नको असून कवयित्रीला जीवनावरची

निष्ठा हवी आहे, कधी अतीत अवस्था प्राप्त झाल्यामुळे ' आज मी भानात नाही ' असे तिला सांगावेसे वाटत आहे; उत्साही मनाने जीवन जगण्याची जिद्द आहे, त्यामुळेच ' प्रश्न सुंदराचा ' असल्यावर ' उत्तरही सुंदरच असू द्या ' हे तिला पटवून द्यायचे आहे. आपलं ' प्राक्तन ' पूर्णतया मिटलेलं नसावं, तर थोडंतरी आपलं अस्तित्व सदैव असावं असं तिला मनापासून वाटते आहे. आपण आपले जीवन उत्कटतेने जगतो आहोत, त्यात दोघांत ( मी आणि जीवन ) दुजाभावच उरत नाही असं ' अनुपम ' सारख्या कवितेत कवयित्री सांगून जाते. ' मी माझी ' आहे, नव्हे–मी माझे अस्तित्व असण्यापुरती तरी वेगळी हवीच हे तिला बजावून सांगावंसं वाटते. आपण जे जीवन जगतो त्याचे स्वरूप कित्येक वेळा खरोखरच अगम्य असते. अगदी भव्य ' चिरेबंदी ' वाड्यात अडकून पडल्यासारखी ती आतच भांबावून जाते. ' आधाराला काय घेऊ ? पाऊल कुठे ठेऊ ? ' असा प्रश्न तिला सतावतो. मग ती स्वतःलाच विचारते,

' कशी उरू—कशी सरू पोरकेपणात अशी
चिरेबंदी वाड्यात माझी वाट कुठे ?–कशी ? '

कित्येकवेळा तिला हवी असतात पाण्याने माखलेली, वाकलेली पाने ! अतोनात फुललेली–पेंगलेली फुले, प्रमत्त नवा सुगंध, गडगडात मिसळलेली विजेची वाहवा, गदमरणारी अर्धपिशी जाणीव आणि नंतरची अपरंपार अशी सुजाण उघडीप ! हे सारे मनोगत ' मला हवी होती ' या कवितेत संजीवनी व्यक्त करतात. सौंदर्य, तेज, अद्भुतता आणि वास्तवाची जाण त्याना हवी आहे. ही ओढ, हे चिंतन, हा विचार काही आगळाच,—पण तितकाच संपन्न म्हणावा लागेल.

या संग्रहात ' ही आशेची कळी ' या कवितेतलं निसर्गाच्या पार्श्वभूमीवरील चित्रण मोठे हृद्य आहे. स्थिर–जड अशा माळाकडे धावणारी, निळ्या परकरावर पांढरी नेलबुट्टी काढलेली एक गोजिरी पोर, केस मोकळे सोडून, हात हवेत उडवीत चाललेली पाहून कवयित्री मोहरून जाते. जणू स्थैर्याच्या शापातून त्या जड माळाला वाचवणारे ते एक चैतन्यच ! ती निर्व्याज–निष्पाप ' आशेची कळी ', परसात उभी राहून डोळे भरून पाहताना तिला वाटतं, ' अजून नाही मानवतेची सरली सुखसंपदा ! ' जीवन सौंदर्यानं नटलेलं आहे, मानवतेनं व्यापलेलं आहे असाच कवयित्रीचा दृष्टिकोण येथे स्पष्ट झाला आहे. संजीवनींच्या जीवनासक्त वृत्तीचे दर्शन

येथे घडते. मानवतेची पूजा करण्याची भावना जाणवते.

अशी ' आशेची कळी ' पाहून उत्साहाने भरून येणारी कवयित्री केव्हा तरी, मनानं नसली तरी, शरीरानं थकणारच ! आता तिचे डोळे दिपू लागतात व त्या डोळ्यांना दिवसभर नामशेष झालेले नक्षत्रांचे आकार दिसू लागतात—, संध्या-छाया डोकावू लागतात. भावगोपिकाही सावल्या सारख्या अज्ञातात हरपून जातात. मग तिला सांगावसं वाटतं,

' अजून आलेली नाही गहिरी हाक
तोंवरच तुझी दीपकळी
लावून घे या उंबऱ्या आत
नंतर मात्र मला रोखू शकणार नाही
कोणाचेच
काहीही. ' ('तोंवरच')

जीवनात संध्याछाया डोकावतानाही आपल्याजवळ जे काही देण्याजोगे आहे ते देण्यासाठी उत्सुक असलेल्या मनाचा हा उद्‌गार संजीवनींच्या विशाल मनाची प्रचीती देतो. तांब्याच्या ' रिकामे मधुघट 'ची आठवण येथे व्हावी.

संध्याछाया डोकावू लागल्या म्हणजे, स्वाभाविकच ' निरोप घेताना ' मन मोकळे करावंसं वाटतं. ते तसं, येथे कवयित्री करते आहे. ' जशी आहे तशी इथे जीव माझा जगवीन, श्वाससंगती सर्वस्व विश्वरूपाला वाहीन ' या शब्दांतून पुन्हा एकदा संजीवनींच्या ' काही तर देत असावं ' या वृत्तीची कल्पना यावी. दारात आलेल्या मुशाफिराला ' दोन उनउन्हित घास ' देणारी ही गृहिणी ' विश्वरूपाला सर्वस्व वाहण्याचाच ' ध्यास घेताना दिसते. भोवतालचं सारं सौंदर्य साठवून घेण्याची चटकच या मनाला लागलेली आहे. अशा क्षणीसुद्धा ते मन हे सारं टिपून घेताना, म्हणतं ' माझे सारेच सुखाचे नाही काही दीनवाणे ' कारण जग हाच गोतावळा आहे; सारेच तिचे स्वजन आहेत. यांचा निरोप घेताना ' जीव ठेवीन मोकळा ' अशी तिची आंतरिक तळमळ आहे.

आपल्या प्रीतीला विश्वव्यापकता यावी असं पतीच्या सहवासात बोलणारी ही गृहिणी ' निरोप घेताना'ही आपल्यातली विश्वबंधुत्वाची भावना बोलून टाकायला विसरत नाही. हीच विश्वबंधुत्वाची कल्पना ' नको निबंधन ' या कवितेत आणखी

एकदा व्यक्त झालेली दिसते. हे मनोगत आपल्या सहजनाजवळ जरी येथे व्यक्त केले जात असले तरी संजीवनींच्या कवितांतून जाणवणारी ही विश्वबंधुत्वाची भावना महत्त्वाची आहे ही गोष्ट जरूर लक्षात घ्यायला हवी. मग तो विचार जीवनविषयक असो, प्रेमविषयक असो वा आत्मपर असो.

विराट जीवनाकडे पाहाताना, स्वतःच्या मनाने केलेले चिंतन, व 'मी आणि जीवन' याविषयी व्यक्त केलेली आत्मपरता ही अगम्य वा गूढ नाही हाच या काव्याचा विशेष! गूढतेच्या वलयात संजीवनी गुरफटत नाहीत. या प्रकारची आत्मपर कविता विश्वबंधुत्वाच्या स्पर्शाने व्यापक झाल्याचे जाणवते. तेच तिचे सामर्थ्य!

'संजीवनी'तल्या कवितांचा विचार येथवर केला. आजच्या मराठी कवितेत संजीवनींची कविता कुठे आहे हे समजून घेणे आता सुलभ व्हावे. 'आजची मराठी कविता' असे म्हणताना संजीवनींची कविता जेव्हापासून लिहिली जात आहे तेव्हापासूनचा काळ येथे लक्षात घेणे अगत्याचे आहे. आजची प्रतिमासृष्टी, मुक्तछंद आणि काव्यातील तरल संवेदना यांचे चित्रण व रविकिरण मंडळाच्या काळातील कवितेचे स्वरूप यांचाही विचार यावेळी करावा लागतो. एकीकडे तांब्यांची कविता भावगीत स्वरूपात आकारत होती, रविकिरण मंडळाचे निरनिराळे काव्यविषयक प्रयोग चालू होते, आत्मनिष्ठ लेखनाबरोबर कुसुमाग्रजांचे वस्तुनिष्ठ लेखन आकारत होते, स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळातील मराठी कवितेने घेतलेली वळणे, मर्ढेकरांच्या कवितेने 'नवकविते'चे घडविलेले दर्शन, हे व अशा प्रकारचे दृश्य संजीवनींच्या कवितेने पाहिलेले आहे. नव्हे, संजीवनींची कविता या सर्व पसाऱ्यातून वाटचाल करीत आहे.

आजपर्यंत संजीवनींचे 'काव्य-संजीवनी', 'राका', 'संसार' 'छाया', चित्रा' व 'चंद्रफूल' हे काव्यसंग्रह प्रसिद्ध झालेले असून 'भावपुष्प' व 'परिमल' हे त्यांच्या गीतांचे संग्रहही प्रसिद्ध आहेत. याशिवाय १९६१ मध्ये त्यांच्या निवडक कवितांचे संपादन 'मराठी साहित्य दर्शन'मध्ये झाले आहे. अशी ही त्यांची कविता गेली चार दशकांहून अधिक काळ रसिकांच्या समोर येत आहे. याशिवाय राज्य सरकारची पारितोषिके मिळालेले त्यांचे बालगीतांचे संग्रह आहेत ते वेगळेच!

नवकवितेच्या आजच्या काळात 'भावकाव्य' व 'भावगीत' या शब्दातला अर्थ अधिक स्पष्ट करून घेण्याचा प्रयत्न आपण केला. आणि भावकाव्य हे भावगीतापेक्षा वेगळे आहे हे कळून आले. पण यापूर्वी, म्हणजे केशवसुत–पंचकानंतर व नवकवितेच्या आधी, विशेषतः रविकिरण मंडळाच्या काळात भावगीतालाच भावकाव्य म्हणताना आपणाला त्यातला फरक जाणवला नाही. वास्तविक, तांबे, रविकिरणमंडळ यांची कविता भावसौंदर्याने नटलेली आहे की गीतसौंदर्याने लुब्ध करणारी आहे याचा विचार व्हायला हवा होता. तसेच पाहिले तर, तांब्यांच्या आधीची कविता, केशवसुत–पंचकाची कविता, तशी गीत स्वरूपाची नाही. टिळक, केशवसुत, बालकवी, गोविंदाग्रज, विनायक, रेंदाळकर इत्यादी कवींच्या कवितांतले सौंदर्य त्यांच्या गेयतेत होते असे म्हणता येणार नाही. पण तांब्यांच्या कवितांच्या मथळ्याखाली 'राग व ताल' लिहिले गेले; आणि ती कविता गीतकाराची, संगीतकाराची असून गाण्यासाठी आहे असे जाणवू लागले. कवितेचे वाचन व गायन एकाचवेळी या कवितेला लाभले. महाराष्ट्रापासून दूर असलेल्या तांब्यांना लोकप्रियता लाभली ती यामुळे! रविकिरणमंडळाची कविता याच काळातली. तिनेही हाच मार्ग अनुसरला. वाचक व श्रोते यांच्यापर्यंत काव्य पोचवले गेले आणि लोकप्रियतेची पावती मिळताच, कविता अधिक लोकप्रिय व्हावी असे प्रयत्न रविकिरणमंडळाने हाती घेतले.—कवितेत निरनिराळे प्रयोग करून रसिकांना लुब्ध केले.

संजीवनींची कविता याच काळात पुढे आली. तांब्याच्या कवितेत जे नजरेत भरणारे दोन विशेष आहेत तेच संजीवनींच्या लोकप्रियतेचे गमक होत. पहिला विशेष म्हणजे गेयता आणि दुसरा म्हणजे प्रेमनिष्ठा! याच्याच जोडीला रविकिरण मंडळातील कवींचे त्यांना लाभलेले साहचर्य हे लक्षात घेतले म्हणजे संजीवनींच्या कवितेचे स्वरूप स्थूल मानाने स्पष्ट व्हावे. पण हे एवढेच म्हणजे संजीवनींची कविता नव्हे! तिच्यात आणखीही काही विशेष आहे. अन्यथा, तांबे व रविकिरण मंडळ म्हणजेच संजीवनींची कविता असे असते, तर संजीवनींना काव्यक्षेत्रात स्वतंत्र स्थान लाभले नसते. याचाच अर्थ संजीवनींच्या कवितेत त्यांचे स्वतःचे असेही काही असले पाहिजे.

संजीवनींच्या कवितेवर तांब्यांच्या संपन्न गीतशैलीचा व उदात्त आशयाचा प्रभाव होता हे खरे. पण तांब्यांच्या प्रेमकवितेहून संजीवनींची प्रेमकविता वेगळी

असल्याचे आपणास जाणवते. ती तांब्यांच्या कवितेप्रमाणे जरी गेय असली तरी ती केवळ बहिर्मुख नाही. येथे स्वप्नाळू प्रणयिनीच्या विविध पैलूंचे दर्शन जसे घडते, तसेच संसारी गृहिणीचे आंतरमन प्रकट झालेले आहे. तांब्यांच्या कवितांत प्रेमविव्हल नववधूविरहिणी–परित्यक्ता यांच्याबरोबरच क्वचित विधुर, मीलनोत्सुक पती, पुनर्विवाहेच्छू विधवा यांचीही चित्रे आहेत. संजीवनींची सर्वच प्रेमकविता त्यांच्या स्वतः भोवती केंद्रित झालेली आहे. तिचा अनुभव व आविष्कार सच्चा आहे; भावोत्कट आहे. त्याचे चित्रण एकवेळ नाट्यपूर्ण असेल पण ते कवयित्रीच्या आंतरमनाचे आहे. ‘ कुणितरी बसावे येउन मज सन्निध ’ असं म्हणताना ही गृहिणी मनापासून बोलते आहे, ‘ गृहिणी येथं मी ’ असं सांगताना तिला आपल्या गृहिणी-धर्माची जाग आहे, पतीच्या प्रेमाचे ‘ ऋण ’ मानण्याइतकी ती प्रामाणिक आहे. ‘ गुल्छडी ’ ला संसारात कशा अवस्थांना तोंड द्यावं लागतं ते तिनं अनुभवलेले आहे, पतीच्याबरोबर संसार करताना त्याच्यात मिसळणे हे जसं तिला हवं असतं. तसंच कधी कधी स्वतःचं अस्तित्वही तिला मोलाचं वाटतं, पतीच्या सुखदुःखात जीव ओतून रमणारी ती एखादे वेळी अंतर्मुख होऊन विचारते, ‘ तीच काय मी ? ’ —कधी स्वप्नसख्याला जागं करून ‘ ऐकतोस ना हे ? अशी असण्यापुरती तरी मी माझी आहे ’ अशी जाण देताना ती दिसते. स्त्रीच्या परिचयाचे हे सारे विश्व तिच्या अनुभवातून आकारले आहे. संजीवनींच्या कवितांतील स्वप्नाळू–प्रणयिनीचे चित्र असेच नाट्यपूर्ण तितकेच भावोत्कट आहे. ‘ शांत सागरी कशास उठविलीस वादळे ? ’ असा प्रश्न विचारणारी प्रणयिनी, ‘ स्वप्नसंगमी संजीवन मिळावे ’ म्हणून ‘ प्रतीक्षा ’ करणारी कुणी, ‘ गोड स्वप्न मनि आठवणारी ’ कामिनी, स्वप्नांचा मधुमास उरात फुलविणारी किंवा सत्यात भेटता आले नाही म्हणून ‘ स्वप्नात येऊ का ? ’ असं विचारणारी स्वप्नराणी, ‘ नकळता निघून जा ’ म्हणून ओठाने सांगणारी आणि आत विव्हळणारी भामिनी अशा प्रकारच्या कितीतरी भूमिका मनापासून व्यक्तविणाऱ्या स्वप्नाळू-वृत्तीच्या स्त्रिया येथे आहेत. ‘ संजीवनी ’ मधील जवळ जवळ सर्वच प्रेमकविता ( ‘ निर्धार ’ हा अपवाद ) एकाच भूमिकेतली आहे, स्त्री-मुखातली आहेत. या प्रेमकवितांतली गृहिणी जसजशी प्रौढ होत जाते तसतशी ती अधिक अंतर्मुख होते, आत्मशोधन करते हा तिचा आणखी एक विशेष आहे. या दृष्टीने ‘ निवेदन ’, ‘ नाही आता ’ ‘ चंद्रफूल ’, ‘ साद तुझी ’, ‘ तू नि मी ’,

' मौन ', ' मी दिवाणी ' या कवितांचा उल्लेख करावा लागेल. संजीवनींच्या लोकप्रियतेचे कारण जसे त्यांच्या गोड गळ्यात आहे, कवितेच्या गेय स्वरूपात आहे, तसेच या स्त्रीच्या परिचयाच्या विश्वात आहे. प्रेमाच्या या विविध छटा, नव्हे हे स्त्रीमनाचे रहस्य संजीवनींनी व्यक्त केले आहे, त्यात तिचे वैशिष्ट्य आहे. ही सारी स्त्रीच्या जीवनातली सृष्टी आहे. ही स्त्री आपल्या परिचयाची आहे. ती रोज आपल्या समोर निरनिराळ्या नात्यात वावरणारी आहे. आपण ज्या स्त्रीला पूर्णपणे ओळखू शकत नसतो, ते तिचं मन संजीवनी उकलून दाखवतात. पण असं मन मोकळं करताना ते तुमच्या आमच्यासाठी केलं जात नाही. ते स्वतःलाच स्वतःची सुखदुःखं सांगतं, कथा—व्यथा बोलून दाखवतं.—आपलं आपल्याशीच हे ' स्व-गत ' आहे ? त्यामुळे ते नाट्यपूर्ण होतं आणि त्याचवेळी आत्मपरही असतं. तांब्यांच्या प्रेमकवितेहून संजीवनींची प्रेमकविता वेगळी आहे ती अशी. तिचं तिला स्वतंत्र अस्तित्व आहे.

रविकिरण मंडळाप्रमाणे संजीवनींच्या कवितेने व्यासपीठावरून श्रोत्यांना जिंकले आहे. त्यांच्यापर्यंत आपली कविता पोचवली आहे. पण यापलीकडे त्यांच्या कवितेने रविकिरण मंडळाचा आपल्यावर प्रभाव पडू दिलेला नाही. सामुदायिक काव्यगायन, व श्रोत्यांची पावती मिळवणं हा रविकिरण मंडळाच्या कवितेचा विशेष होता. त्यात प्रामुख्याने यशवंताची भावगीते आत्मपर आहेत, तर गिरीशांची बव्हंशी रचना वस्तुनिष्ठ आहे, माधव ज्यूलियनांच्या काव्यातला उपहास-वैचारिकता इत्यादींमुळे तिचे स्थान तसे स्वतंत्रच आहे. संजीवनींच्या कवितेचे नाते फार तर यशवंतांच्या कवितेशी जोडता येईल. पण तरीही संजीवनींची अशी कविता स्त्री-वलय ओलांडून जात नाही. स्त्रीच्या विश्वात ती जशी मनस्वी रममाण होते तशी अन्यत्र गेली तर ' कविता ' हरवून बसते, आणि तिथे उरतात फक्त संजीवनींचे मवाळ शब्द !

तेव्हा, संजीवनींची कवित्ता रविकिरण मंडळाच्या काळात जन्माला आली व तांब्यांच्या प्रभावानं झपाटली गेली असं म्हणणं कितपत योग्य आहे त्याचा निर्वाळा आता आपण घेऊ शकतो.

संजीवनींची कविता तांब्यांप्रमाणे आध्यात्मिक गुंजन करीत नाही, गूढ होत नाही. तिचे परमेश्वरावर प्रेम आहे. त्याच्या कृपेवर तिचा विश्वास आहे आणि म्हणूनच संसारचित्रे रेखाटताना तिचा संसार सुखानं चालू आहे.

संजीवनी जीवनासक्त आहेत. त्यांना सौंदर्याचं वेड आहे. आणि त्या त्यांच्या दोनही आसक्तींचा आविष्कार त्या आपल्या शब्दांची किमया पसरून करतात. त्यांची कविता कशी आकारते ते त्यांनी स्वतःच 'कविता स्फुरते कशी' मध्ये सांगितले आहे. त्यांचे शब्द इतके अचूक, मधाळ व सुरेल असतात की त्यांना कवितेला आकार देताना थांबावेच लागत नाही. त्यांचे शब्द प्रारंभी प्रारंभी तर पदन्यास करीतच येत नाहीत ना अशी शंका यावी इतकी सहजता त्यात आहे. आज नव-कवितेच्या काळात संजीवनींची कविता मुक्तछंदाकडे वळत आहे, अधिक अंतर्मुख होत आहे. गेयतेपासून ही कविता जरी दूर जात असली वा तिची प्रतिमासृष्टी नव्याने रूप घेत असली तरी ती दुर्बोध नाही. संजीवनींच्या कवितेला ते फारसं पेलवेल असं वाटत नाही.

संजीवनींची कविता भावपूर्ण आहे तशीच गीतबद्ध आहे. ते भावनांचे गीत आहे; गीतमय रचना हा काव्याचाच एक प्रकार आहे हे सोयीस्करपणे विसरले जाते. पण मराठी कविता एकेकाळी भावगीतामुळेच जगत होती काव्यक्षेत्रातील पोकळी भरून काढीत होती. त्यात संजीवनींचा वाटा आहे.

'संजीवनी'मधील कविता सामान्य स्त्रीच्या अनुभवाला बोलकं करणारी आहे. तिचं मन, तिची कथा, तिचा संसार, तिचा परिवार, माहेर-सासर, यातूनच ही स्त्री साकार होत आहे. स्त्रीनं स्त्रीला साकार केल्यामुळे हे सारेच चित्र उत्कट व प्रामाणिक अनुभवाचा परिपाक आहे. तशात सोपेपणा, आत्मलेखन, मधाळ शब्द, गेयता, यामुळे ही 'संजीवनी,' रसिकाला जवळची, आपलीशी वाटावी हे स्वाभाविक आहे. त्यातच तिचे यश आहे, आणि त्याच तिच्या मर्यादा आहेत.

गुढी पाडवा,<br>३१ मार्च १९७६

— भालचंद्र खांडेकर

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२४५४
२३५-७०
काव्य ग्रंथ घरे
शाखा (स्थळ प्र)

# कविता स्फुरते कशी

कशी अचानक जनी प्रगटते मनातली उर्वशी
मी न कुणाला सांगायाची कविता स्फुरते कशी

कुंभ रसांचे शिरी घेउनी शब्दांच्या गौळणी
नजरेपुढती ठुमकत येती रूपवती कामिनी
हसती, रुसती, विसावती कधि, तरंगती अंबरी
स्वप्नसख्या त्या निजाकृतीचा वेध लाविती उरी
त्यांच्या नादे करू पाहते पदन्यास मी कशी
मी न कुणाला सांगायाची कविता स्फुरते कशी

अवकाशावर धुंद उषेचे स्मित ओघळते कसे
स्मितासवे त्या उन्मेषांचे बाग बहरती कसे
क्षितिजमंडली अथवा झुकते रजत पौर्णिमा कशी
मनोभाव न्हाणीत राहते शीतल ज्योत्स्नारसी
अंतरबाहिर एक सुरावर घुमे सुरावट कशी
मी न कुणाला सांगायाची कविता स्फुरते कशी

हे स्वरसुंदर जीवनमंदिर कुणी कसे उभविले
मी न कुणाला दावायाची शिलालेख आतले
समईमधली ज्योत अहर्निश भावभरे तेवते
तिच्या प्रकाशी कुणापुढे मी हितगुज आलापिते
कशी नाचते, कीर्तनरंगी हरपुन जाते कशी
मी न कुणाला सांगायाची कविता स्फुरते कशी

# गीत

गाईन तुला मी माझे मंजुळ गीत
मन रिझवायाची अनुपम माझी रीत
हे अश्रू जातिल नयनांतुन माघारी
खिन्नता जिवाची मावळेल ही सारी
येतील फुलोनी आशांच्या सुममाला
जग मंगलमय हे गमेल तव हृदयाला
हृदयींची सारी तळमळ होइल शांत
गाताच तुला मी माझे मंजुळ गीत

या म्लान तरुलता उठविति कटु आभास
अंतरी तयांच्या दडला परि मधुमास
पसरिते काजळी जनहृदयात निशा ही
छे, फिरवि जगावर रवितेजाची ग्वाही
गाईन तुला मी हे सारे दिनरात
मन रिझवायाची अशीच माझी रीत

ऐकवीन तुज मी तारांचे मधुगान
करिशील श्रवण जे हरपुनि तनुमनभान
ते मंगलमंदिर तुजपुढती उभवीन
जीवात्मा अंती होई जेथ विलीन
घेशील भरारी विहंगमा गगनात
गाताच तुला मी माझे मंजुळ गीत

प्रभु मज नाचू दे स्वच्छंद
कशास आता पदी जखडिसी
हे अवजड भवबंध ?

प्रभातकाळी सायंकाळी
गगनसुमावरि चढते लाली
तियेवरुनि पद फिरवू दे मज
सेवित तेजोगंध

सुनीलवसना रजनी राणी
गाई मज शांतीची गाणी
त्या तालावर उधळू दे मज
अंतरिचा आनंद

गिरीदरीतुनि क्षितिजावरुनी
विहरू दे मज स्वैर नर्तनी
या नितनूतन विश्वकमळिचा
मी चिरतृषित मिलिंद

प्रभु मज नाचू दे स्वच्छंद !

# प्रतीक्षा

वाटत असते अकस्मात तू देशिल मज दर्शन
म्हणुनि अहर्निश सज्ज राखिते मी माझे अंगण

सप्तसुरातुनि येशिल वाटे घुमवित तव बासरी
प्रतिपळि घेते चाहुल श्रवण्या ती अनुपम माधुरी
प्रभातवायूसवे वाटते सुगंध तव येइल
साठविण्या तो भावसंपुटे राखित मी सोज्वल

कधी वाटते याचकरूपे येशिल माझ्या घरी
म्हणुनि प्रीतिचा गोड घास मी घेउनि बसते करी
कधी वाटते स्वप्नसंगमी देशिल संजीवन
संसारावरि कधि न खिळविते म्हणुनी मम लोचन

युगानुयुग मी बसेन पाहत वाट तुझी मोहना
कवण्या रूपे दर्शन परि तू देशिल मज सांग ना ?

## दयाघना

पद टाकिन मी परि दयाघना
तू उभा पाठिशी असशिल ना ?

प्रखर वाहुनी पिसाट वारे
नाशितील वनवैभव सारे
परि पर्णांतरि एखाद्या रे
सुमरूपी मज दिसशिल ना ?

सरता स्नेहाची मधुमाया
येइल विपदा घालित छाया
वच धीराचा समयि अशा या
प्रेममया तू वदशिल ना ?

रात्र वादळी असो भयंकर
खुशाल तारू कापिल अंतर
कधितरि बिजलीरूपे अंबर
भेदुनि, चमकुनि जाशिल ना ?

वाट यशाची शोधुनि शोधुनि
हताश कधि मी येता परतुनि
अवतरुनी पूजिल्या शिलेतुनि
संजीवन मज देशिल ना ?
तू उभा पाठिशी असशिल ना ?

# कोण ?

या अथांग जीवनात कोण नित्य वावरे
कां अशी अशांतता नसानसात संचरे

अंबरिचा सांध्यमेघ
पुलकित करि अंगअंग
भावनेत त्रिविध रंग कोण रेखितो करें

मंदिरि गंभीर नाद
घालि कणकणात साद
शांतकाय चेतनेत भरित कोण कापरे

फुलायचे, सुकायचे
तरि इथे वसायचे
हे कळून स्वप्नसुमन का उगा विरे, झुरे

भासती दिशा भयाण
तळमळे कुडीत प्राण
नुरत त्राण तरिहि कोण अंतरी उरे, फिरे
या अथांग जीवनात नित्य कोण वावरे

# शांत सागरी कशास

शांत सागरी कशास उठविलीस वादळे
काय हे तुझ्यामुळे
देहभान हरपले
युगसमान भासतात आज नाचरी पळे

निमिषमात्र लोचनात
दिव्य तेज दाविलेस
भडकुनी तयेच वन्हि जीव आतला जळे

अमृतमधुर बोल एक
श्रवणि जो न पाडिलास
अधिरता भरे जिवात केव्हढी तयामुळे

पढविल्या वदे वचांस
बद्ध त्या विहंगमास
गायिलेस तू कशास गीत नंदनातले

स्वर्ग कल्पनेतला
येइल कधि भूतला
दिवसरात्र अंतरात आस ही उचंबळे

# स्प्वनस्मृती

नयनात नीज मी साठविते
ते गोड स्वप्न मनि आठविते

अशीच होती रात्र चांदणी
रंगत होत्या तारा नर्तनि
गुंग चराचर गीतगायनी
ती अद्‌भुत जादू मनि भरिते

दिव्य मूर्तिची सुखद साउली
हळूच माझ्या मंदिरि आली
स्मिते सुगंधी भवती फुलली
स्वप्नात स्वप्न जणु मी बघते

स्कंधावरुनी ओढणी गळे
केशपाश शिरि मुक्त सळसळे
धुंद गोड मम नयनी तरळे
मज जिंकियले मदने पुरते

हृदयेशे मज जवळि घेतले
गुपित गोडसे कानी कथिले
लाजत मी काही पुटपुटले
त्या रम्य स्मृती मनि पालविते

अशीच राहो रात्र चांदणी
नशा चढो माझिया लोचनी
जीवन पाहू दे मज स्वप्नी
ज्यावाचुन जग हे आज रिते
ते गोड स्वप्न मनि आठविते.

कशास न कळे हा जिव आतुर
कसली त्याला लागे हुरहुर ?

कधी भंगल्या मूर्तींसाठी
कधी उडाल्या स्वप्नांपाठी
कधितरि स्मृतिसरितांच्या काठी
अश्रुफुलांची विणितो झालर

विरलतेत हा चित्र रेखितो
मौनातुनि संगीत उकलतो
कधी रित्या घटिकांवर रचितो
मनोराज्य अति भीषण–सुन्दर

स्नेहविकल एकाकी जिव हा
रात्रंदिन भिरभिरतो वाया
न पुरे या गगनाची छाया
वसुधेचे या थिटेच मंदिर

अशा पिशा जीवाची चिंता
किती बाळगू उठता बसता
कशी वागवू धरुनी हाता
जीवबाळ हा तरल अनावर !

आला स्वप्नांचा मधुमास
उमलवीत उरिचा उल्हास

निद्रेच्या भूमीवर फुलल्या
स्वप्नसुमांच्या कळ्या कोवळ्या
मूक मनीषा अंतरातल्या
उधळती स्वैर सुवास !

ही नटवी प्रीतीची कलिका
घडिघडि दावी अनंतरूपा
धुन्द करी अर्पुनि मनमधुपा
अद्भुत प्रणयविलास

टवटवली मृदु शैशवसुमने
लेवुनि ते मधुमंगल लेणे
अनिर्बंध मन गुंगत गाणे
भोगी छंदसुखास

जागृतीत जे जे वांछियले
ते ते या स्वर्भूमधि रुजले
रसरंगे अंतर्जग नटले
नाचत जीवनरास

नवजीवन देती हृदयाला
या जगिच्या नितनूतन लीला
शिकवित हासुनिया करण्याला
सत्याचा परिहास

आला स्वप्नांचा मधुमास

# सुंदरते सखि !

सुंदरते सखि ! मजला लाविसी लळा
निज सुरम्य कर माझ्या घालिसी गळा
अनुविध रूपे लेवुनि
रंजविसी मजलागुनि
मन्मानसि नवलांचा फुलविसी मळा
कोलाहलि बावरता
गुंगसि मधुसंगीता
दिङ्मंडलि भ्रमविसि मज त्यजुनि भूतला
चपलेहुनि तू अचपल
जलदाहुनि सांद्र तरल
कुसुमाहुनि तू कोमल स्नेहमंगला
परिसाया तव पदरव
आतुर मम भावभाव
जीवविहग तुझियास्तव देहि राहिला
सुंदरते ! तव पायी
जीवनलय लागावी
तव करेच मुक्तिलाभ होउ दे मला
सुंदरते सखि ! मजला लाविसी लळा

# कुणितरी

कुणितरी बसावे येउनि मजसन्निध
हळुवार कथाव्या गोष्टी नानाविध
त्यायोगे जाइल उदासीनता लया
अन् मानसनौका निघेल मुलखा नव्या

कुणितरी म्हणावे मज मी अति नाजुक
पेलते कसा भवभार न त्या ठाउक
जाणीव एव्हढी देइल प्रोत्साहन
अन् गात्री येइल नवजीवन दाटुन

कुणितरी करावे मद्‌गुणसंकीर्तन
नित धीरकृतीला द्यावे आवाहन
विश्वास नवा येईल मनी उमळुन
मी सरेन पुढती हासत सरसावुन

कुणितरी पहावे मन्मुखि टक लावुन
जननान्तरसौहृद दावावे उकलुन
जिव अननुभूतिने होइल वेडापिसा
अन् हर्षे येइल फुलुन नभासारखा

कुणितरी हसावे मुक्तहास्य मजसवे
कुणितरी मजसवे ढाळावी आसवे
कुणितरी करावी साथ मला दिननिशी
ही तरीच जाइल सरुनी कासाविशी

## निर्धार

ठेविलेस स्कंधी विश्वासाने शिर
सोडायाचा धीर
नाही आता
गुंफिलेस प्रेमे हात माझ्या हाती
घ्यायचे मागुती
नाही आता
चाललीस वेगे सप्तपदी संगे
फिरायाचे मागे
नाही आता
गायिलेस भावे गोड यशोगान
धरायाचे मौन
नाही आता
दाविलास मोदे आशेचा प्रकाश
व्हायचे उदास
नाही आता
साजणी ! संसारी मुक्तिचे माहेर
सरायचे दूर
नाही आता

# सुखमय हा संसार

करू ये सुखमय हा संसार

निष्कामाच्या वेदीवरती
करू अधिष्ठित प्रीतीमूर्ती
सुकृतिच्या सुंदर सुमनांचे वाहू तिजवर हार

मनिचे चिंताघन उडवाया
विरून उसने वितुष्ट जाया
गुणी जनांना खुले करू या निजस्नेहाचे दार

दांभिकतेची न ठरो दृष्टी
कुटिलांची दुरि राहो सृष्टी
यास्तव निजवृत्तींना लावू निस्पृहतेची धार

दया क्षमा शांतीचे आगर
प्रकाशमंदिर करु अपुले घर
अनन्यभावे परमेशाचा पूजू जगदाकार

धर्म अर्थ कामाचे सुव्रत
कायावाचामने आचरित
नवराष्ट्राचे पालवु अंकुर तेजवंत झुंजार !

करू ये सुखमय हा संसार !

# एक सानशी कळशी

किती वेळ लाविसी ओढण्या
एक सानशी कळशी पोरी
दिस मावळला तरी न अजुनी
दिवा लागला पुढल्या दारी

एका मागुन एक भराभर
रहाटास विळखा दोरीचा
हातांसरशी खाली वरती
नाच चालला तुझ्या उरांचा

मधेच धापा टाकित पुसशी
घाम भाळिंचा निजपदराला
पुन्हा पुन्हा न्याहाळुन बघसी
वरवर येणाऱ्या कळशीला

नकळे केव्हा वरी यायची
कळशी जळभरली वा अर्धी
तळात पाणी असे वा नसे
तेहि कळेना काळोखामधि

किती वेळ हे असे कळेना
तुझे ओढणे चालायाचे
सांग कधी तव सुभग करांनी
तृषितांना जळ लाभायाचे ?

## आज चराचर उजळे

आज चराचर उजळे दिव्यशा प्रकाशे
हळुहळु प्रतिदल उमलत हृत्कला विकासे

धूसर शामल गगनी
ये निरभ्रता दिसुनी
गारठल्या वस्तुजाति नवस्पंदन भासे

अंकुरत्या बीजातुन
मातांच्या कटिवरून
प्रकृतिचे प्रगतरूप हुंकारत हासे

रावरंक सानथोर
रचिति नवे प्रभुमंदिर
मानवता मूर्ति आत स्थापिति उल्हासे

सकळा गृह अन्नवस्त्र
प्रतिमुखात प्रेममंत्र
नवभारतधर्म होत प्रगट सत्यवेषे

लवते शिर, दाटे उर
काया कापे थरथर
रेखित संकल्प नवे मन उत्कट श्वासे

प्रतिभे ! चल उचल चरण
जा क्षितिजे ओलांडुन
दे जगा सुकाव्यदान शिवसुंदर ऐसे
आज चराचर उजळे दिव्यशा प्रकाशे

# निवेदन

ठेव सख्या ! मजवरि विश्वास
तुझ्याचसाठी मी धरियेली
संसाराची कास

बाल्यापासुन मज जडलेला
मुशाफरीचा गाढ जिव्हाळा
अवचित माझ्या चरणी पडला
तव ऋजुतेचा पाश

गमले सरली इथेच यात्रा
ग्लानी आली अवघ्या गात्रा
परिसुनि तव प्रणयाच्या मंत्रा
धुंद चढे हृदयास

सृष्टीच्या अनुविध रूपांतुन
तत्त्व दिसे जे मज नितनूतन
ते तुझिया उत्कट स्पर्शातुन
भिडले मम हृदयास

हाक शिवाची अनंतातली
जो नच या श्रवणांवर आली
तोवरि राहिन तव पदकमली
करिन सुखद सहवास

ठेव सख्या ! मजवर विश्वास

# न कळता निघून जा

जायचे असेल तरी न कळता निघून जा
फूल फूल हुंगता
चांदण्यात गुंगता
देहभान हरपता खुशाल मजपुढून जा

केशपाश सोडुनी
त्यात वदन झाकुनी
रुसुनि बैसते तदा लपत छपत दूर जा

गान गायिल्यावरी
बीन सारुनी दुरी
थकुनि नयन झाकिते त्या क्षणी उठून जा

क्षणिक जायचे असे
लागु दे तुला पिसे
विरहि मीलनी सुखे मजसि गुंगवून जा !

आणि जर अखेरचे
तुज असेल जायचे
जात जात पदतली प्राण हे चुरून जा

जायचे असेल तरी न कळता निघून जा

# साद तूझीं

भाववेगे येउ पाहे मी तुझ्या रे मंदिरी
साद तूझी ती खुणेची येइना श्रवणावरी

माझिया सुस्वागताला सज्ज उल्हासून ती
बंद दारे पाहुनीया आज भांबावे मती

धुंदिने भारावलेले नेत्र तूझे स्वप्निल
भावगंधे वेष्टिलेले बोल तुझे मंजुल

मग्नता ती चिंतनाची, ती वृथा अस्वस्थता
स्मरत सारे झुरत राहे विरहिणी मी शंकिता

जीव माझा सानुला रे प्रीत माझी थोरली
लक्ष पुष्पांनी तुवा जी गंधवोनी ठेविली

गंध का होई नकोसा, म्लान की झाली फुले
कोण कैसे पेटवीते भाग्य माझे आगळे

कोठली पडसाद, तूझी साद येईना जरी
हरपले की रत्न माझे जे रुळे वक्षावरी

# तीच काय मी ?

तीच काय मी, तुझ्या पथावर
जिने पसरिली छाया
तुझ्या पदीचा दाह साहुनी
जिची डंवरली काया ?

तीच काय मी जिने चोरिली
जाग तुझी चिंतांची
मिटल्या नयनी तुझ्या फुलविली
माया स्वप्नफुलांची ?

तीच काय मी जिची रागिणी
तुझ्या बिलगली कवना
तीच काय मी श्वास जियेचा
तुझ्या स्पर्शला प्राणा ?

तीच काय मी दुजीच अथवा
आज इथे एकांती
अश्रूंच्या डोहात विझविते
धगधगत्या स्मृतिज्योती !

# नाही आता

नाही आता ठेवणार
मोहपाशी गुंतवून
नाही काही मागणार
मीच आपुली देईन
नाही घालणार मनी
वियोगाचा ताळमेळ
नाही पुसणार कधी
पुनर्भेटीचा सुकाळ
नाही ओठी आणणार
शल्य मनी सलणारे
नाही नेत्री दावणार
भाव मनी झरणारे
वेदनेच्या काव्यांमधे
प्रेमपूर्तीचा गुलाब
काटयांविण फूल हाती
असा घडवीन लाभ

# तू नि मी

सख्य कुणाशी ? – एक तुझ्याशी
द्वैत कुणाशी ? – तेहि तुझ्याशी
उरी फुले अनुराग तुझ्यास्तव
विराग उसळे तोहि तुझ्यास्तव
नजर सदा मम तुझ्या ध्रुवावर
चरणगतीला तुझाच आवर
उणे अधिक या जिण्यात जे जे
तुझ्या सुखाचे त्या दरवाजे
तुझ्या नि माझ्या अचल मीलनी
क्षितिजमनी नभसागर जुळणी
काल तू नि मी, आज तू नि मी
उद्या तू नि मी, सदा तू नि मी
सर्वस्वाची अशि उठाबशी
प्रतिजन्मी मी खेळे तुजसी

## मौन

नितळ मुक्याने वाहे पाणी
वृक्ष मुके तीरावर दोन्ही
निमुट तरंगति वरति पाखरे
मुके निळे नभ, मुकेच वारे
सळसळताना ऊस थांबला
मुकाट मागे डोंगर बसला
मुके मधुप, जग मुके येथले
काळोखाची मुकी पाउले
मनात असुनी काहीबाही
मूक उभे आपण दोघेही

माझ्या माहेराची वाट
पानाफुलांची, फळांची
मखमली हिर्वळीची

माझ्या माहेरचे घर
जसे गोकूळ नंदाचे
घर परमानंदाचे

माझ्या माहेरची रीत
रीत ऋजू वळणाची
स्नेह आणि सौजन्याची

माझ्या माहेराची कीर्त
लोकी दुर्मिळ दुर्मिळ
कस्तुरीचा परिमळ

माझ्या माहेराचा मान
वडिलांनी वाढविला
आम्हाहाती सोपविला

माहेरची फुलवात
सासरचे निरांजन
प्रकाशाला आमंत्रण !

# माझे आई

सुखाचिया सागरात
हेलावता जीवभाव
तुझ्या स्मृतीते ना ठाव
माझे आई !

शृंगाराच्या साउलीत
फुलवीता भावकळ्या
तुझ्या स्मृती कोमेजल्या
माझे आई !

यौवनाच्या अहंतेने
संकटांशी झुंजताना
दूर तुझ्या स्मृतीखुणा
माझे आई !

मात्र तान्ह्या लेकराला
चुंबिताना कवळोनी
तुझी स्मृती माझ्या मनी
माझे आई !

# गृहिणी येथ मी

गृहिणि येथ मी, हे माझे घर
ये घडिभरि अंतरी मुशाफिर

कुण्या गावचा तू रहिवासी
आज कोणत्या मुलखा जासी
असे शिदोरी की उपवासी
पथि कोणी सांगाती–सहचर ?

ये, आदर हा घास उन्हउन्हित
वापीतिल घे प्राशुनि अमृत
मंडित करि ही भू संमार्जित
मातेपरि जी चिरस्नेहातुर

सांजवातिच्या मंद प्रकाशी
करिशिल जरि हितगुजे अम्हासी
विरघळतिल दुःखांच्या राशी
सौख्यसुधेचे सुटतिल पाझर

उद्या दमाने, खुल्या दिलाने
जाशिल तू अपुल्या मार्गाने
मम अश्रूंचे अभंग लेणे
लटकावुनि दाटल्या उरावर

अश्रुफुलांनी याच रात्रंदिन
मानवतेचे करिते पूजन
मुखात एकच मंत्रोच्चारण
' गृहिणि येथ मी, हे माझे घर ! '

ये घडिभरि अंतरी मुशाफिर

# मी दिवाणी

धुंदल्या संवेदनांनी रंगली माझी कहाणी
मी दिवाणी, मी दिवाणी

तोडुनीया बंध येथे बाल्य माझे वाहताहे
यौवनी वार्धक्य वेडे डोकवूनी पाहताहे
कापुराची ज्योत झाले भूतभावीवर्तमानी
मी दिवाणी, मी दिवाणी

जाहली मज मेघबाधा उरि धरी मी जीवनाते
नाचते मयुरापरी नित मीच माझ्या स्वागताते
सुंदराचे स्वप्न माझ्या पाहिलेले लोचनांनी
मी दिवाणी, मी दिवाणी

वेदनेला स्पर्शिता मी आसवांचे दान देते
स्नेहगाथा ऐकिता मी अर्पणाची साद देते
मी चकोरी प्रेममग्ना चंद्रवेडी रोमरोमी
मी दिवाणी, मी दिवाणी

# ऋण

माझी हाक ऐकुनीया तूच धावुनीया यावे
सारे अवजड ओझे शिरी वाहुनीया न्यावे

माझे भाव कोमेजता तूच शिंपावी आसवे
रससुगंधांचे भार शिरी आनंदे झेलावे

माझा राग शमवाया तूच बनावे कोमल
माझ्या दुर्बलतेसाठी अंगी साठवावे बल

माझ्या बोलांसाठी सूर तूच घोळवावे कंठी
स्फूर्तीसाठी उकलाव्या अंतरीच्या गुजगोष्टी

माझे जगवाया जासी तूच तुला विसरून
माझे मागील जन्माचे का रे फेडितोस ऋण ?

# तू न माझा एकटीचा

युद्धभूवर झुंजसी तू दूर येथे राहते मी
धीर सामावून चित्ती विरहवेणा साहते मी

घडिघडी तव वृत्त येता नेत्र भरुनी पाहते मी
विक्रमाची शर्थ होता आसवांनी नाहते मी

गात भूपाळी इथे मी की तुझ्या ये जाग डोळा
गात अंगाई इथे मी की तुझ्या ये नीज डोळा

घास हाती ठेविते मी भूक की तूझी शमावी
शब्द ओठी आणिते मी वृत्ति की तूझी फुलावी

तू न माझा एकटीचा, कोटि जीवांचा सखा तू
निश्चयाचा मेरु तू रे संभ्रमाला पारखा तू

विसरला मानव्य वैरी हरपली नयनीत त्याची
आज त्याच्या दंडनाला सज्ज मूर्ती वामनाची

धर्म जेथे जयहि तेथे पाडसा ! तुज सांगते मी
झुंज इच्छापूर्तिसाठी यश प्रभूला मागते मी.

निळ्या पर्करावरी काढिली
बेलबुट्टि पांढरी
सुसाट माळावरी धावते
पोर एक गोजिरी

केश मोकळे, भाव मोकळे
कर कवळे नाचवी
त्या माळाला जणु स्थिरतेच्या
शापांतुनि वाचवी

जडता देही, जडता चित्ती
उभि मी परसामधे
नयन मात्र अस्वस्थ धावती
घडिघडि माळाकडे

ही आशेची कळी पाहता
वाटे मज सर्वदा
अजून नाही मानवतेची
सरली सुखसंपदा !

# गुल्छडी ही

गुल्छडी ही गंधवेडी
कामना ही लाजरी
अंधकारी गोरमोरी
दीप्तिने ही बावरी

स्फूर्तिने तेजाळते ही
भ्रांतिने कोमावते
अगतिका ही वेगवेडी
मनगतीने धावते

मोतियांचा हिज न चारा
ही दवाने तृप्तशी
रेखिते कैलास स्वप्नी
हंसिका ही मानसी !

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
६५८३
दा. क्र. 23५-७८
काव्य १५धा८२

गाजते जनात तुझे ग कौतुक
वेल्हाळ कुसुमकळी

वाटते मनात उजळते सुख
जीवनी अंधारवेळी

तुला निरखिता मनी मोहरते
बसंती दिसांची सय

तुला जोजवीता करी एकवटे
विश्वाची वत्सल लय

उन्हात न्हातेस जळी खेळतेस
पितेस चांदणे धुंद

नेत्री करितेस आगळी आरास
गातेस अनोखा छंद

उल्हास आवर लागेल नजर
उमज पडू दे बाई

कुणीसे बोलले—आत्ताच बांधिले
वाऱ्याने पैंजण पायी

जरा उन्हाचा दरारा
जरा वाऱ्याचा फवारा
जरा वळवाच्या धारा
पहाता पहाता लाजते–विराजते–नाराजते
प्रपंचप्रांगणत फुललेल्या
माझ्या परोपरीमधले
हे गंधफूल !

स्मिताचा थेंब मनोहर स्फूर्तीचा गंध अरूवार
सत्यशिवाचाच हा सुंदर आविष्कार
रसविलासात रमलेल्या
माझ्या परोपरीमधले
हे भावफूल !

असे शीत चंदनी अंग असा झुरावावरा संग
स्वर्गधरेच्या संगमाशी हा स्वप्नदर्शी विहंग
नक्षत्रताऱ्यांनी वेढलेल्या
माझ्या परोपरीमधले
हे चंद्रफूल !

## ही कृपा

मला लाभलेला हा जन्म
माझ्या पोटी आलेली मुलेलेकरे
या कुलकन्या, कुलवधू
त्यांची ही मुलेलेकरे
ही वास्तू, हे आप्त सखे सोयरे
ही कृपा हरीची

या जीवनावर सतत
मिटत उमटत रहाणारे हे सप्तरंग
यांच्या दर्शनात अनिमिष
आणि सावधान मी दंग
ही कृपा हरीची

कृपेची ही महासरिता
सळसळत येते
नागिणीच जणु दिव्यलोकातून
शिंपीत येते अनंत अमृतकण
हालाहल निर्घृण उतरते
चढत जाते प्रेमाची धुन
ही कृपा हरीची.

# स्त्री माझे नाव असे

नव्या जुन्या सीमेवर माझे मज गाव दिसे
संस्कृति मी जणु समूर्त, स्त्री माझे नाव असे
गृहिणी मी कष्टतसे वृद्धांस्तव, बालांस्तव
सुलभ मला पतिप्रेमा, दीनांचा मज आठव
सदनाहुनि स्वर्ग फिका हेच स्वप्न पाहतसे !
शिक्षक मी ज्ञानाची चिर मजला अभिलाषा
अणुअणूस आकळते बालमनाची भाषा
ध्येय हाच देव मला अक्षय त्या पूजितसे !
मी विनम्र सेवक जनि सेवाव्रत चालविते
अश्रूतुन हास्याचे शत अंकुर पालविते
कर्म हाच धर्म जगी, तोच मला तारितसे !
कलावती मी, माझी नितनूतन अनुभूती
सुंदरतापूजक मी, तीस्तव मम अभिव्यक्ती
मी उन्मन चिरअथांग रसरंगी नाहतसे !
शास्त्रज्ञा वाहत मी संशोधनकार्य धुरा
नारायणरूप शास्त्र देइल कधि काळि नरा
संजीवनिमंत्र तेच, ही श्रद्धा दाटतसे !
मी कांता, मी माता, शिक्षक मी, सेवक मी
कलावती, शास्त्रज्ञा, विविधगुणी नटते मी
विश्वाची मी प्रतिभा, मजमधि समृद्धि बसे !
संस्कृति मी जणु समूर्त, स्त्री माझे नाव असे !

## स्वप्नात येउ का ?

सत्यात नाहि आले    स्वप्नात येऊ का ?
विसरायचे तरीही    स्मरणात साठलेले
ते रूप प्रेमवेडे    पाहून जाउ का ?
हृदयात रंगलेले    लाजेत गुंतलेले
ओठावरी उभे ते    गाऊन जाउ का ?
हसता नभात तारा    हसता फुलात वारा
प्राणात हासते ते    उधळून जाउ का ?
तूझी म्हणून घ्यावे    स्वप्नीच हे घडावे
ही आस सानुलीशी    पुरवून घेउ का ?
सत्यात नाहि आले    स्वप्नात येउ का ?

# मज श्याम भेटला

एकाकिनी म्हणूनी हिणवू नका मला
मनिच्या वनात माझा मज श्याम भेटला

बरसून शांत होता सर श्रावणातली
ये ऊन्ह सोनियाचे अति मंद पाउली
तेव्हाच जीवनी तो हुंकार जागला

आली घडून दैवे प्रियभेट त्या क्षणी
मी स्वप्न जाहले त्या प्रेमार्द्र लोचनी
जन्माहुनी नवा तो सायुज्य सोहळा

लास्यातुनी विजेच्या त्याचेच हासणे
बहरातुनी धरेच्या त्याचे विराजणे
त्याचाच दशदिशी हा अनुराग रंगला
मनिच्या वनात माझा मज श्याम भेटला.

# प्रीत हवी तर

प्रीत हवी तर वृथा कशाला पाळाया जनरीत हवी
प्रीत हवी तर दोन मनांना अपुलाली नयनीत हवी
प्रीत हवी तर हवेत अश्रू विरहाचा अंगार हवा
प्रीत हवी तर माथ्यावरती अभिन्नतेचा भार हवा
प्रीत हवी तर नेत्रांपुढती प्रलयघनांचे चित्र हवे
प्रीत हवी तर मनी नि ध्यानी निश्चल ध्रुवनक्षत्र हवे
प्रीत हवी तर भवती हळवा संसाराचा व्याप हवा
प्रीत हवी तर त्या व्यापाला अलौकिकाचा शाप हवा
प्रीत हवी तर व्यथेव्यथेतहि रसरंगाची साथ हवी
प्रीत हवी तर उरात केवळ प्रीतीवरली प्रीत हवी

# यात्रा

काही बोलावेसे वाटे　　पण बोल उमटेना
मुके रहावेसे वाटे　　पण वाचा आटोपेना
काही दवडावे वाटे　　त्याचा छंद आवरेना
काही साठवावे वाटे　　त्याचा आवर पडेना
स्वप्न रचावे वाटता　　डोळा नीज गवसेना
पहाऱ्याची वेळ येता　　दृष्टी जागता जागेना
कोणी चिरडाया येता　　त्याची गती रोखवेना
कोणी पायदळी जाता　　त्याची कीव करवेना
ममतेचा अभिषेक　　मज उरी झेलवेना
दुराव्याचा तीव्र ताप　　मज शिरी घेववेना
जरा स्थिरावे वाटता　　मज चाल मोडवेना
जरा उडावे वाटता　　मज जड सोडवेना
मज माझे ओळखेना　　मज कळ सोसवेना
उभ्या यात्रेमधे कोणी　　मज देव भेटवीना

## जीवना रे

सत्य तुडवीत पायी दंभ मिरवित डोई
सख्य पुकारीत येऊ जीवना रे नको
ऊन्ह अडवीत हाते पायी पसरित काटे
माझे म्हणवीत येऊ जीवना रे नको
मायेविरहित मिठी तेजाविरहित दिठी
असे संगतीस राहू जीवना रे नको
होता विकल्पवादळ उणावता आत्मबळ
मज घृणेने अव्हेरू जीवना रे नको
अनावर आशयात माझे झेपावता चित्त
मज व्यर्थात खिळवू जीवना रे नको
नको तृप्तीत गोठवू नको स्मृतीत साठवू
मज मुठीत मिटवू जीवना रे नको
तुझी प्रिया मी भाविक रहा होऊन प्रेमिक
खोटी जवळीक जोडू जीवना रे नको !

# त्या क्षणी आलास का ?

मी न माझी राहिले तू त्या क्षणी आलास का
नेणता माझ्या जिवाला स्पर्शुनी गेलास का ?
उन्ह पिवळे उमललेले पांखरांनी प्राशिलेले
डोलता पानाफुलांनी रोमरोमी हुंगिलेले
केशपाशी पीस त्याचे खोवुनी सजलास का ?
लाविली देवांगनांनी ज्योत संध्यामंदिरी
आरतीची झांज गेली अंबरी झंकारुनी
भर्जरी शेला स्वरांचा अंगि तू ल्यालास का ?
स्तिमित तुजला निरखितांना घालिता करपाश देही
सर्वभावे आळवीता साकडे वाहून पायी
वाढत्या कोलाहली त्या मौन तू बनलास का ?
ज्ञानगंगा लोपली अन् भावमूल्ये फोल झाली
आसुरी तृष्णा त्वरेने जीवना ग्रासीत आली
होउनी तप्ताश्रु नेत्रीं मुक्त ओघळलास का ?
मी न माझी तू न तुझा आपुला हा सोहळा
वर्णितांना मुग्धतेने दाटुनी आला गळा
बावऱ्या ओठातला उद्‌गार तू बनलास का ?
मी न माझी राहिले तू त्या क्षणी आलास का ?

## आज मी भानात नाही

प्राप्त झाल्या अद्‌भुताच्या
आज मी भानात नाही
असुनही अतिनिकट, तूझ्या
आज मी ध्यानात नाही
यौवनाच्या आरतीच्या
आज मी गजरात नाही
या वसंती वैभवाच्या
आज मी बहरात नाही
वृष्टिच्या या पर्वकाळी
आज मी तृष्णेत नाही
संगमी स्वप्नांचिया रे
आज मी निद्रेत नाही
जीवघेण्या कामनेच्या
आज मी पाशात नाही
प्राप्त झाल्या अद्‌भुताच्या
आज मी भानात नाही !

# अमरदिवा

मर्त्य आमुच्या हाती आम्ही
धरिला आहे अमरदिवा
श्वसनी अमुच्या भरुनी राहे
स्वर्गामधली विमल हवा

अनामिकांची दिव्य गायने
अम्ही ऐकतो अहर्निशी
अपार्थिवाची स्वप्ने बघुनी
होते अमुची नीज पिशी

जळस्थळ आहे फितुर अम्हाला
अता गतीला काय कमी
वाटेवाचुन प्रवास अमुचा
नाविक अन् नौकाहि अम्ही

अधीरतेतहि अम्हा दिलासा
नयनी आम्ही ध्रुव धरिला
अशुभनाशनासाठी अद्भुत
हृदयी आम्ही शिव वरिला

अमरदिव्याची अद्‌भुत कांती
प्रकाशिते ही भुवनत्रयी
भुवनोज्वलता ती बघताना
उजळे विश्व अम्हा हृदयी

कणाकणावर नवी काजळी
दीपोत्सवही नित्य नवा
मर्त्य आमुच्या हाती आम्ही
धरिला आम्ही अमरदिवा.

# प्रश्न सुंदराचा

प्रश्न सुंदराचा आहे उत्तर सुंदर असू द्या
मनभाव उल्हासित वृत्ती निर्भर असू द्या
शीतशामल रात्र कलते चंद्रबिंब
मंद चांदण्यात मग्न सृष्टी न्हाऊन चिंब
शांत तारे वारे शांत झुकते जल
शांतीच्या मंत्राक्षरात मुग्ध चलअचल
पूर्वेला प्रकाशाचे पाऊल नवथर असू द्या
प्रश्न सुंदराचा आहे उत्तर सुंदर असू द्या
झुळझुळते लोकजीवन, ओंगळ तळचे तळात
स्वच्छ निर्वेध मांगल्य संपूर्ण घटाघटात
अवचित तळही निवळ अस्मानी आशीर्वादात
कणाकणात सुवर्ण, प्राण तृणातृणात
कंठात राग अनुराग बसंतबहार असू द्या
प्रश्न सुंदराचा आहे, उत्तर सुंदर असू द्या
संकल्पात आनंदगंध, झेपेत आशा अमोल
स्पर्शात स्वाद सुधामय, शब्दात ध्वनि सखोल
स्मृति सुदूर क्षणोक्षणी निशेच्या स्वामित्वाची
तेजाला मोहर जेथे तेथे धाव अस्तित्वाची
अवघ्या असारात सार इतकेच ध्यानात असू द्या
प्रश्न सुंदराचा आहे उत्तर सुंदर असू द्या.

# हवा उन्मनी

दोन ध्रुवांच्या हलग्यांमधुनी
झुला मनाचा गुंतविला मी
जळास्थळाच्या सीमेपुढली
हवा उन्मनी प्राशियली मी
क्षितिजा भिडुनी खुडुनि तारका
मुक्तकुंतली माळियल्या मी
नभःसराच्या जळात अविरत
व्यथा पोळल्या क्षाळियल्या मी
स्वर्गभूमिच्या शिखरावरती
अमृतवल्ली रोवियली मी
तिची अभावित गंधमोहिनी
कधीपासुनी सेवियली मी
मी आरोहुनि उभी मजवरी
लयप्रलयाची मला न भीती
सूरशब्द रसरूपमत्त मी
हस्त शिवाचा माझ्या माथी.

# प्राक्तन

आज एकदम वाटलं
की आपण संपलोय्. पार खलास झालोय्.
कुणीतरी आपल्यावर पाय देऊन
आपला चेंदामेंदा केलाय्
काही अस्तित्वच उरले नाहीए आपल्याला.
खूप हवा भरलेलं आपलं तरंगतं जगणं
पार सपाट करून टाकलंय् कुणीतरी
फुलांफुलांच्या फाद्यांनी
आभाळभर खिदळणाऱ्या आपल्याला
पूर्णपणे उन्मळून टाकलंय् कुठेतरी.
वाटलं की आपण भडकून पेटून गेलोय्
आणि आपली राखसुद्धा उधळलीय् वाऱ्यावर.
आणि मग जराशाने एका स्वप्नवत् क्षणी
वाटलं की जगावं.
परत गोळा व्हावं, उठावं, फिरावं, तरंगावं,

पुन्हा एकदा
सर्वांगांनी असावं आपण
आणि नसलोच, तरी निदान
आपल्याला हात असावेत
आपल्या अभागी प्राक्तनाचे
डोळे पुसण्यापुरते तरी !

## पारिजात थरथरला

अंगणि आला वारा
चाहुल त्याची लागुन माझा
पारिजात थरथरला

अतीव हळव्या स्वरलहरींनी
त्यास वेढिलें स्वप्नकरांनी
देह तयाचा क्षणभर झाला
सोनपऱ्यांचा झोला

सुकली पाने हासुन उठली
नजर कळ्यांची विस्मित झाली
ओढुनि त्यांनी अंगी धरिला
गंधकेशरी शेला

पाउल पाउल वाजवि वारा
नाचनाचता भुलल्या तारा
त्या तारांनी फुलांतुनी मग
दीपराग आळविला

शुभलक्षण तो वारा येउन
दान अलौकिक गेला देउन
पारिजात हा तेव्हापासुन
तृप्तीतच विरघळला

## अनुपम

माझ्या आकांक्षांचा
अनुपम लग्नचुडा
कुंकुमतिलक
माझ्या प्रणयाचा निरागस
संवेदनांची उत्कट
अंगुलिवलयें
गळा मंगल स्वप्नपाश
दुजेपणाचा अंतर्पट सारीत
अशी जीवभेट
आता सप्तपदी
जीवनाचीच
जीवनासमवेत

# प्रेमाकार

एका सुवर्णक्षणाला जग प्रेमाकार झाले
दृष्टिक्षेपात स्पर्शात
श्वासांचिया आवेगात
निराधार जाणिवेत प्रेम अंकुरित झाले
धुंद खगांच्या कूजनी
मंद गंधार्त सुमनी
निळ्या स्नेहाळ गगनी प्रेम प्रकाशित झाले
त्याची वाऱ्याशी फुगडी
पाणियासी लाडीगोडी
मनोमनी घडोघडी प्रेम प्रवाहित झाले
माझे प्रेमासंगे गुज
गोपाळाचे अलगुज
स्वरसंमोहन त्याचे विश्वी विराजित झाले
प्रेम आदी प्रेम अंती
प्रेम सर्वत्र सांगाती
असे सर्वस्वाच्या ठायी प्रेम माहेराला आले
एका सुवर्णक्षणाला जग प्रेमाकार झाले.

## मी माझी

तुझ्या सुखाची सनई
साती स्वरांनी शहारली
संकल्पांची आकाशवेल
पिकून लवली
तेव्हा मी होते
फेसाळून लोटली
व्यथेची काळनदी
भडकून उठली
अपेक्षांची आग
तेव्हा मी होते
तेव्हा होते, आत्ताही आहे
स्वप्नसख्या ! ऐकतोसना हे ?
अशी असण्यापुरती तरी
मी माझी आहे

जन्मा आले तेंव्हा होते
किती किती दूर
पाच सोबतिणींच्या संगतीत
होते रमून चूर

एकदा दिसला पाठीशी
चिरेबंदी वाडा
महालावर महाल खडा
तट तरी केव्हढा

सर्वांवरती बाराद्वारी
तीवर भिरभिर वारे
अफाट विस्तार, अनाम ध्वज
कोणासाठी सारे ?

कोण राजा कोण प्रजा
कशा खाणाखुणा
छेडित काळोखाच्या तारा
आळवीत बसू कोणा ?

आधाराला काय घेऊ
पाऊल कुठे ठेवू
अरूपाच्या छायेपुढे
वात होऊन तेवू ?

कशी उरू—कशी सरू
पोरकेपणात अशी
चिरेबंदी वाड्यात माझी
वाट कुठे ?—कशी ?

## मला हवी होती

मला हवी होती पाने
पाण्याने माखलेली, वाकलेली
मला हवी होती फुले
अतोनात फुललेली, पेंगलेली
मला हवा होता सुगंध
प्रमत्त नवा
गडगडाटात मिसळलेली
विजेची वाहवा
मला हवी होती
गदमरणारी जाणीव
अर्थपिशी
आणि नंतरची अपरंपार उघडीप
सुजाण अशी

## म्हणून सांगते

तूच विचारलंस
म्हणून सांगते
की सांगणं माझं अजून
सरलेलं नाही

एकीवरला बहर
गळला नाही तोच
दुसरीवर फुटणाऱ्या
नवांकुरांचं नवल
मला अजून
कळलेलं नाही

तूच विचारलंस
म्हणून सांगते
की अजून माझी
पहिलीच आहे ठेवण
रंगाची गंधाची
आकृतिबंधाची
फक्त रीत वेगळी
छंदाची

तूच खुणावलंस
म्हणून थांबते
एरवी चालणं माझं अजून
संपलेलं नाही.

# तू तरी

शिणलेला दिवसदिवस
आणि रात्रदेखील
आले आहे चालून चालून
वखवखलेली भूकतहान
ओठात पोटात मिटूनमिटून

आशा नव्हती स्पष्ट मनात
पुसट फक्त भाव
जाईन तेथे माझे घर
राहीन तेथे गाव

घडले नाहीत उत्पात कुठे
नाही वैर वेड
वाट चुकेन असा कुठेच
नव्हता अंधारउजेड

तरीदेखील शिणत गेले
चुकत गेले सारे
'फीर फीर' सांगत राहिले
वरून आभाळवारे

फिरून देखील कुठे जाणार
दिशा फक्त दहा
तू तरी हातचा म्हणून
पुढे उभा रहा.

## अचानक ?

तुझ्या भेटीसाठी मी जर अचानकच आले ?
काय करशील ? आत घेशील
दारीच उभी ठेवशील
डोळे भरून बघशील अथवा
दृष्टीच टाळून देशील
सांडशील अथवा गिळून टाकशील
शब्द ओठी आले ?

आपण होऊन जवळ आले
अधोवदन झाले
रीत सोडून मागे जरा
पुढे झुकत गेले
खुडून घेशील अंगोपांगात
जेव्हढे फुलून आले ?

येऊ अथवा नकोच येऊ
कोणते साहस करू ?
पंखांवरती भिस्त टाकून
नवखे आभाळ फिरू
खूण करशील तिथून जर मी
वाट चुकत गेले ?

# भूमी

जीवन आणि मृत्यू
यांच्यामध्ये जी भूमी आहे
ती माझी आहे
हे तू मला सांगितलेस

त्या भूमीची वाट
तू मला दाखवलीस
डोंगरदऱ्या ओलांडून
क्षितिजापार डोकावण्याची जादू
तू मला शिकवलीस
मी मला विसरेन
म्हणून तू दूर गेलास
शब्द स्मरणात बांधीन
म्हणून तू सूर नेलास

तुझ्या ठिपक्यात
मला आकृती
आणि
निर्गमनात
स्वीकृती

# स्पर्श तुझा

स्पर्श तुझा दूरातुन
खुणावीत मजसि उभा
कुरवाळित गुपित कथित
पाठविते शब्द-खगा

स्पर्श तुझा अजुनि कसा
आणित मज बेहोषी
मधि असता विरहाच्या
धगधगत्या हिमराशी

स्पर्श तुझा—की न तुझा
झुरणारी ती न मीहि
हे मायाजाल असे
तो न स्वर्ग, ही न मही

स्पर्शशून्य होताना
थरथर ये मन प्राणा
हा कसला कोंब फुटे
उन्मळून पडताना ?

प्रेम माझं माझ्यातच रहातं
माझ्यांतळं खातं पितं
माझ्या नजरेत पेंगतं
हृदयाकाशांतल्या रंगतरंगात गुंगतं
कधी वसंतोद्यानांत
फुलं होऊन रंगतं
प्रेम कधी माजघरात मावळतं
परसदारात धुमसतं
कधी प्रेम देव्हाऱ्यांत दडतं,
लटकी लालसा पांघरून
प्रेम रंगमहालात घुसतं
खूप खूप नाटकं करतं
काय करणार
कुठं जाणार
गाऱ्हाणी न्यायची ती
माझी मलाच;
शासन घडायचं
ते माझं मलाच
माझ्याच प्रेमाकडून,

# तोंवरच

दिपलेल्या डोळ्यांना दिसू लागले आहेत
दिवसभर नामशेष झालेले
नक्षत्रांचे आकार
बधिरलेल्या श्रवणाना ऐकू येत आहेत
संध्येच्या शामचाहुली क्षितिजापार
कधीच बुडाले आहेत शब्दांचे घट
अर्थशून्यतेच्या प्रवाहात
भावगोपिकाही सावल्यांसारख्या
हरपल्या आहेत अज्ञातात
अजून आलेली नाही गहिरी हाक
तोवरच तुझी दीपकळी
लावून घे या उंबऱ्या आत
नंतर मात्र मला रोखू शकणार नाही
कोणाचेच
काहीही.

# कवितेवाचून

पहिल्याप्रथम खरे तर ती
आपण होऊन येत होती
तिने आखली नव्हती वाट,
रेखला नव्हता घाट
तिचा तर होता
परीसारखा थाट
अलगद उतरेल भरारेलही तशीच
मात्र जाताना एकेक लावण्य
पावलाखाली ठेवून जाईल
नंतर झाली ती सुपरिचित
क्षितिजावरच आली बसायला
सोडून आभाळ तारांकित
येताना कधी कधी मात्र
साशंक व्हायचे तिचे नेत्र
पावले थबकायची
सावरीत आपली आभरणे
विचारायची
'अशी येऊ की तशी?'
आपण उठावे स्वागताला
'कशीही ये' म्हणावे तिला

आता मात्र मीच म्हणते
'बये ये ग –'
पण येतात फक्त विषय
नाना दिशांतून – नानाविध –
बोचकारतात, अडवतात
घालतात कडू गोड उखाणे
वेधू बघतात आसावलेले लक्ष
अखेर परतून जातात ओशाळून
आणि मी एकटीच उरते
कवितेवाचून
उरत नाहीही !

## शुभरजनी

साठविते सुमरूप तुझे मिटल्या नयनी
दूरदेशच्या फुला ! तुला ही शुभरजनी
परोपरीची क्रीडा तव रे असेल सरली
सांजमाउली आंदोळुन तुज असे परतली
तारांचे पसरून स्मित तुझ्या मधुवदनी !
आज लतेने तुला माखिला रंग कोणता
अवकाशाने तुला अर्पिला गंध कोणता
ओवाळुनि दंव कुणी टाकिले तुजवरुनी ?
जननांतरिचे गूज स्वतःशी गुंजत रंगत
पंख विजेचे लावुनि आले कोण भरारत
नवलाचा घातला उखाणा सांग कुणी ?
फुला ! जरासा मूक राहसी बोलबोलता
स्तब्ध राहसी लहरीसंगे डोलडोलता
जाणवले का सहकंपन तुज सुखक्षणी ?
उरी अहर्निश विसंगतीचे हीण सांठते
चुम्बुनि घ्यावे तुझे फूलपण नित्य वाटते
हाती केवळ तुझ्या स्मृतीचा स्पर्शमणी !
दूरदेशच्या फुला ! तुला ही शुभरजनी

माय मराठी ! तुझिया पायी तनमनधन मी वाहियले
तुझिया नामी तुझिया धामी अखंड रंगुनि राहियले
कष्टामधली तुझीच गोडी चाखायाची मज आई
मला आवडे तुझा विसावा तुझीच निर्भर अंगाई
तुझे झरे अन् तुझी पाखरे वास तुझा जनलोक तुझा
हवाहवासा मला वाटतो राग तुझा संतोष तुझा
माय मराठी ! तुझिया अंकी लोळण घेते बागडते
तसेच अलगद तव आभाळी भरारणे मज आवडते
तुझे चालणे तुझे बोलणे दाखव मजला रीत तुझी
जे ओठी ते पोटी असली शिकवी मजला प्रीत तुझी
तुझियासाठी गुंफित बसते मोहनमाला शब्दांची .
अर्थ साजरा गंध लाजरा नवलपरी पण रंगांची
माय मराठी ! तुझियासाठी वात होउनी जळते मी
क्षणाक्षणाने कणाकणाने तुझ्या स्वरूपा मिळते मी

# अर्थ नवा

आज लाभला इतिहासाला
एक मनोरम अर्थ नवा
त्या अर्थाला समर्थ करण्या
अता मिळू द्या शब्द नवा

मृत्तिकेवरी चढली मेंदी
आभाळावर साज नवा
दीप्तीने लखलखून उठला
चैतन्याचा दिवा नवा

स्फूर्तीचा झंकार नवोनव
कंठामधला सूर नवा
फलकावरती रंगरेष नव
शिल्पातुन आकार नवा

हा शक्तीचा, हा युक्तीचा
कर्तृत्वाचा थाट नवा
पुरुषार्थाने आज बांधिला
जनगंगेला घाट नवा

अवतरली नवतीच नव्याने
तिच्या पाउली जोष नवा
तिच्या भक्तिची अभिनव रीती
आरतिचा उद्‌घोष नवा.

# नवगौरव

जय स्वतंत्रता, नवभारत जय
नव्या युगाचा हा नवगौरव.

राष्ट्रप्रीतिचा भक्तीचा जय
नवआशांच्या मुक्तीचा जय
नव क्षितिजावर उषा उधळिते
त्या सुखसुंदर तृप्तीचा जय !

बलशाली रणधीरांचा जय
कृतिवीरांचा शूरांचा जय
भारतकीर्ती दिगंत नेती
विश्ववंद्य त्या नेत्यांचा जय !

जय साधूंचा, विद्वानांचा
कलाधरांचा, श्रमजीवींचा
पंचमहाभूतांचा जय हा
चिरविजयाचा हा नवगौरव !

# नको निबंधन

तुझ्या नि माझ्या घरा असावी
भिन्न दालने, एकच अंगण
भिन्न असावी नावे गावे
माथ्यावर पण एक निळेपण

मनामनातुन एकच श्रद्धा
जरी दैवते वेगवेगळी
जरी निराळ्या आशा भाषा
संस्कारांची एक पातळी

सुखदु:खा आकार निराळे
जीवभाव परि एक असावा
कौशल्याच्या तऱ्हा निराळ्या
कर्मयोग परि तोच असावा

तुझ्या नि माझ्या हृदयामधुनी
चैतन्याचे एकच स्पंदन
अभंग अपुल्या एकपणाला
स्थळकाळाचे नको निबंधन

# निरोप घेताना

जशी आहे तशी इथे
श्वासांसंगती सर्वस्वी
इथूनच घेईन मी
सुखे ऐकत राहीन
आहे तिथूनच वेगे
फूलपंख्यांचा सुगंधी
मिटणाऱ्या डोळ्यांनी मी
हुडहुडी येताना मी
पाहीन मी हासुनिया
अश्रुभार आवरीन
माझे सारेच सुखाचे
मीच गावे नि ऐकावे
मला सारेच स्वजन
मात्र निरोप घेताना

जीव माझा जगवीन
विश्वरूपाला वाहीन
पानाफुलोऱ्यांचा गंध
वेड्या श्रावणाचा छंद
मला येईल धावता
माग येईल काढता
सांजसकाळ पाहीन
ऐन उन्हात न्हाईन
सुख वहात जाताना
दुःख सामोरे येताना
नाही काही दीनवाणे
मनामुखातले गाणे
जग माझा गोतावळा
जीव ठेवीन मोकळा !

# परिशिष्ट

## आई, तुला दाखवू का

आई, तुला दाखवू का बाबा होऊन
खुर्चीवर बसतो, दे चहा आणून
आई, तुला दाखवू का भाऊ होऊन
देई पैसे, आत्ता देतो भाजी आणून
आई, तुला दाखवू का ताई होऊन
दाणे गूळ देई, घेतो खेळ मांडून
आई, तुला दाखवू का आजी होऊन
नैवेद्याला ठेव, देतो पूजा करून
आई, तुला दाखवू का बाळ होऊन
घाल बरे मांडी, घेतो जरा लोळून

आई, बघ आकाशात
ढग आले काळे काळे
कुणी अस्वलाएवढे
कुणी हत्तीएवढाले
उन्हाळ्यात का ग त्यांना
होते ठेविले कोंडून
चहूकडून हे आले
दरवाजे का फोडून ?
आई, ऐक आवाज हा
येतो ढोल नगाऱ्याचा
आभाळात माजेल का
धुमाकूळ लढाईचा ?
चंद्रसूर्यांना हे सारे
टाकितील का मारून
आई, कसे पडायचे
मग चांदणे नि उन्ह ?

माझ्या किनई स्वप्नात
आली एक राणी
ती म्हणाली—मला हवंय
गुलाबपाणी
गुलाबपाणी घेऊन
आली एक दासी
तिने ओतल्या दारात
गुलाबांच्या राशी
गुलाबांच्या राशीतून
आला एक नाग
म्हणाला—अरे मुला
शहाण्यासारखा वाग
त्याचं ऐकून शहाण्यासारखा
पटकन उठलो
बघ कसा मुकाट्याने
अभ्यासाला बसलो
स्वप्न पण पाहिलं
अभ्यास पण केला
सांग पाहू कोणतं बक्षीस
देणारेस मला ?

हे घर कुणाचं कुणाचं
हे घर मातीचं पाण्याचं
विस्तववाऱ्याचं, झाडावेलींचं
फळाफुलांचं, मुलांचं !

हे घर कुणाचं कुणाचं
हे घर किडामुंग्यांचं
माशापक्ष्यांचं, ससाकासवांचं
वाघलांडग्यांचं, मोराचं !

हे घर कुणाचं कुणाचं
आजाआजी, बाबाआई
दादाताई काका मामा
शहाणावेडा आला गेला

हे घर साऱ्यांचं
सारीच घरं साऱ्यांची
चंद्रसूर्य ताऱ्यांची.

तू आहेस बेबी, मी आहे आई
बरं का ग आई हे, विसरायचं नाही.
सकाळ होताच मी तुला उठवीन
मीच तुझे दात घासून देईन
दुधाचा पेला पाहून रडायचं नाही !
अभ्यास झटपट करून घ्यायचा
देईन तो झगा घालून घ्यायचा
शाळेला जाताना रुसायचं नाही
बाबा आणि मी फिरायला जाऊ
ताईजवळ तुला खेळायला ठेवू
दोघींनीं मुळींच भांडायचं नाही
शुभं करोती पावकी नि पाढे
म्हणून दाखवायचे नेमाने तेव्हढे
पाढ्यांवाचून तू जेवायचं नाही
झोपताना मात्र तू आई व्हायचं
अंगाई म्हणत थोपटत राह्यचं
दुपारचं काही आठवायचं नाही
बरं का ग काई, हे विसरायचं नाही.

## नको बाई रुसू

काळे काळे भोळे
पूस बचू डोळे
कोणी बोलले रागे
कोणी धावले मागे
भिऊन नको बसू
खेळव गुबऱ्या गालांवर
गोड गोड हसू
नको बाई रुसू

वेडीवाकडी वाट
नि काळोख दाट
पायात आणून बळ
सोसून थोडी कळ
गाणे म्हणत रहा
नि पुढे जाऊन पहा
लागेल उजेड दिसू
नको बाई रुसू

मुलासारखं कोमल
फुलासारखं निर्मळ
वाऱ्यासारखं चपळ
सोन्यासारखं उजळ
असं आपण व्हायचं
मागे नाही रहायचं
याहून वेगळं काही
ऐकून नको फसू
नको बाई रुसू
नको बाई रुसू

REFBK-0023547
REFBK-0023547
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र.
काव्य



गेली उणीपुरी चाळीस वर्षे संजीवनीबाई सातत्याने कविता लिहित आहेत आणि त्यांनी मराठी काव्यक्षेत्रात स्वतःचे असे आगळेवेगळे स्थान निर्माण केले आहे. संस्कारी स्त्रीमनाला जीवनाच्या ज्या ज्या आंगोपांगांचे स्वभावतःच आकर्षण असते ती ती सर्व त्यांनी आपल्या प्रतिभेने गोंजारली आहेत आणि निरागसतेने फुलवली आहेत. त्यांची कविता, पायी छंदाचे घुंगर बांधूनच जन्माला आली आहे असे वाटते. तिचा प्रत्येक पदन्यास तालासुरातच पडत असतो. तिच्या सहज नर्तनातून आपल्या हृदयभूमीवर अळित्याची जी नाजूक पावले उमटतात त्यांतून रसाचे विलोभनीय चित्रबंध आपसुक तयार होत जातात आणि सौंदर्याचा चटका लावतात. उपमेत बोलावयाचे झाले तर संजीवनीबाईंची कविता ही फुलपाखरासारखी आहे, तशीच चित्रमयी, रंगमयी आणि आनंदमयी ! ती स्वभावतःच कोमल, तरल आणि स्वप्नवेडी आहे. पण जीवनातील कटुतिक्त अनुभवांना सामोरी जाण्यास ती कधी कचरलेली नाही. चिखलातून अत्तर गाळण्याची कमळ-विद्या तिला अवगत असल्यामुळे अशा अनुभवांतूनही ती समृद्ध झाली आहे आणि त्याचमुळे आपला मूळ स्वभाव अव्यंग ठेवून अधिक सूक्ष्म आणि सखोल बनली आहे. तिचा हा समृद्ध रूपाविष्कार गेल्या चार दशकातील तिच्या विविध भावोद्‌गारांतून या संग्रहात संकलित झाला आहे.